
# साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक



भिंतीवरील या चुकचुकणाऱ्या पालीची बहिण तिला आता औरंगाबादेहून भेटायला येणार आहे म्हणून ती जणू आनंदून गेली आहे हे श्रीबाबांनी अगोदर कथन केले. व खरोखरीच त्याप्रमाणे झाले.
श्री बाबांना प्राण्यांची भाषाही अवगत होती!

मार्च १९८४) (किंमत १ रुपया

श्री साईनाथ [illegible]



संमेलनाचे सुरवातीला श्री साईबाबांच्या प्रतिमेची यथाविधि पूजा अध्यक्षांचे शुभहस्ते होत आहे. शेजारी श्री. काकरेसाहेब व अगदी कडेला कार्यालय अधिक्षक श्री. द. चि. पाठकसाहेब.




संमेलनाचे अध्यक्ष श्री. रामचंद्र नाईक यांना शाल व श्रीफळ देऊन संस्थान तर्फे न्यायालयधारक श्री. काकरेसाहेबांनी सत्कार केला.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥

# श्री साईलीला

श्रीसाईबाबा संस्थान,
शिरडीचे अधिकृत मासिक

: संपादक :

**श्री.क.हि.काकरे**

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

डॉ.श्री.दि.परचुरे
एम. ए. पी. एच. डी.
( इंग्रजी आवृत्ती )

श्री.सदानंद चेंदवणकर
( मराठी आवृत्ती )

## श्रीसाई वाक्सुधा


वर्ष ६२ वे)     किंमत १ रुपया     (अंक १२

श्रीसाईलीला मार्च १९८४

दूरध्वनी
८८२२५६१



: कार्यालय :
" साईनिकेतन ", प्लॉट नं. ८०४-बी, डॉ. आंबेडकर पथ, दादर. मुंबई-४०० ०१४.



वार्षिक वर्गणी रु. १०/- (ट.ख.सह) किरकोळ अंक १ रु. फक्त.

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृती ॥



# श्रीसाई वाक्सुधा

गुरुनाम आणि गुरुसहवास ।
गुरुकृपा आणि गुरुचरण पायस ।
गुरुमंत्र आणि गुरुगृहवास ।
महत्प्रयास प्राप्ती ही ॥५८॥

प्रचंड शक्ति यथा पोटीं ।
अनन्य भक्ती घेतली कसवटी ।
भक्तांसी मोक्षद्वारखंटी ।
नेतील लोटीत न कळतां ॥५९॥

गुरुसंगति गंगाजळ ।
क्षाळिते मळ करिते निर्मळ ।
मनासम दुजे काय चंचळ ।
करिते निश्चळ हरिचरणीं ॥६०॥

आमुचे वेदशास्त्र पुराण ।
श्रीसद्गुरु चरण सेवन ।
आम्हां योगयाग तपसाधन ।
लोटांगण गुरुपायीं ॥६१॥

श्रीसद्गुरु नाम पवित्र ।
हेंचि आमुचे वेदशास्त्र ।
"साई समर्थ" आमुचा मंत्र ।
यंत्रतंत्रही तें एक ॥६२॥

— श्री साईसच्चरित अध्याय १ला

दानेन तुल्यो विधिरस्ति नान्यो
लोभाच्च नान्योऽस्ति रिपुः पृथिव्याम् ।
विभूषणं शीलसमं न चान्यत् ।
सन्तोष तुल्यं धनमस्ति नान्यत् ॥


दानासारखे दुसरे पुण्यकर्म नाहीं
लोभाहून दुसरा कोणी शत्रू नाहीं
शीलासारखे उत्तम भूषण नाहीं
आणि
संतोषासारखे दुसरे धन नाहीं

# अनुक्रमणिका मार्च १९८४


| | |
|---|---|
| १) संपादकीय | — संतांचे कार्य |
| २) श्रीसाईलीला १० वे लेखक–कवी संमेलन | — साईनंद |
| ३) प. पू. मोहिते बाबा आणि पालखी | — श्री श्रीराम सातर्डेकर |
| ४) शाश्वत धर्म गोत्रा सनातन पुरुष | — श्री. अनंत चितांबर. |
| ५) अगा हे असेचि घडले — | — श्री. प्रल्हाद हुल्याळकर. |
| ६) साई माऊली | — श्री शहाणे |
| ७) श्रीसाई स्तवन | — राहुल अ. खानविलकर |
| ८) श्रीसाई स्तवन | — श्री. रा. वि. गाडगील |
| ९) साई तू भक्तोंका आधार | — सौ. चंद्राबेन भाटे |
| १०) साईनाथा तुजविण आता | — सौ. सरोजिनी मुळ्ये |
| ११) साईमाऊली | — श्री. मधुकर अंबाडे |
| १२) साई नमस्कार | — श्रीमती लिलावती गुजराथी |
| १३) साईस्मृति | — सौ. भावना जेऊरकर. |
| १४) मुखी सदा साईनाम | — श्री. मनोहर दळवी. |
| १५) श्रीसाईनाथाय नमः | — विजय साने |
| १६) साईनामाचा गजर | — श्री राम धनावडे. |
| १७) श्री. नाथांच्या मुखकमलावर | — श्री. म. कृ. विखारे |
| १८) साई जेव्हां नाहीं संगे | — श्री. दत्ता कदम. |
| १९) तेच बाबा मंदिरात | — श्री. संजय परळकर |
| २०) परीसपदी | — श्री. बी. जी. चव्हाण |
| २१) आराधना | — सौ. वासंती नांदेडकर. |
| २२) श्रीसाई | — श्री. सुभाष खारकर |
| २३) बाबांनी नोटीस फिरविली | — कु. वत्सला आजगावकर. |
| २४) आमचे श्री साई | — श्री. सुरेश कोपरकर. |
| २५) कपडे मिळाले | — सौ. उमा वाळिंबे. |
| २६) बाबा मी चुकले | — सौ. दमयंती कदम. |
| २७) भक्तीचा अनुभव | — कु. सुजाता मुळे |
| २८) बाबांमुळे बॅग मिळाली. | — सौ. विनोदिनी राजपूत. |
| २९) श्रीसाईबाबा एक — युगपुरुष | — श्री. बिपिन स्वादिया |
| ३०) बाबांच्या सहवासात आलेले प्राणी | — श्री. माधव गोरे |
| ३१) शिरडीवृत्त | — ऑक्टोबर ८३. |
| ३२) शिरडीवृत्त | — नोव्हें–डिसेंबर ८३. |

# संतांचे कार्य

स. न. वि. वि.




पिकली पंढरी पिटला धांडोरा ।
कोणे आले घरा सभाग्यांच्या ।।
चंद्रभागे तिरी उतरले बंदर ।
आले सौदागर साधुसंत ।।
वैष्णव मिळोनी केला असे साठा ।
न घे तो करंटा अभागिया ।।
एका जनार्दनी आले गिऱ्हाईक ।
वस्तु अमोलिक साठविती ।।

ग्रहांची युती झाली म्हणजे जगात जसे मोठमोठे उत्पात होत असतात तसेच शुभग्रह एकत्र आले म्हणजे जगात महत्वाच्या अशा चांगल्या घडामोडीही आपोआप घडू लागतात. हाच नियम संत सज्जनांच्या मेळाव्यालाही लागू आहे. संत सज्जन हे दैवी शक्तीचे पुरुष लोक कल्याणाच्या तळमळीने एकत्रित झाल्यास त्यातूनच जगात सुख शांती नांदविणारी ईश्वरी शक्ती उदयास येते, येत असते. म्हणूनच पूर्वीच्या काळी महाराष्ट्राचे स्फूर्ती केंद्र असलेल्या पंढरी क्षेत्रात श्री ज्ञानेश्वर, नामदेव इत्यादी संतांनी "दोही बाही संतांची सभा । सिंहासनी उभा श्री विठ्ठल" याप्रमाणे श्री पांडुरंगाच्या अधिष्ठानाखाली संतसभा भरविण्याची प्रथा सुरू केली होती. सर्व संत आपापले पंथभेद विसरून जनतेत एकाच दिशेने प्रसार-प्रचार करण्याची स्फूर्ती घेऊन जात होते. परंतु कालांतराने ही प्रथा बंद पडली.

तुका म्हणे धर्म रक्षावयासाठी
देवासही वाटे जन्म घेणे

जगात न्याय नीतिचे रक्षण करण्यासाठी स्वतः देवालाही प्रसंगी अवतार घेऊन श्रम-कष्ट करावे लागले व लागतात. तेव्हां देवाप्रमाणेच संतांनी जर हे कार्य न केले तर देवाला संतोष कसा काय वाटेल? देवासाठी जीवन घालविण्याचा संकल्प केलेल्या संतांनी देवाच्या दीन लेकरांचे दुःख उघड्या डोळ्यांनी पहाता येईल काय?

देवाचे म्हणोनी देवी अनादर ।
हे मोठे आश्चर्य वाटतसे ।।

आता येरा जना म्हणावे ते काई।
जया भार डोई संसाराचा ।।

हे संत तुकाराम महाराजांचे शब्द आपण नेहमी लक्षात ठेवले पाहिजेत. या जगात रंजल्या-गांजलेल्या जीवाना त्यांच्या दुःखातून सोडविण्यातच खरे साधुत्व आहे. भलेपण आहे.

"तुका म्हणे संतपण याचे नाव ।
जरी होय जीव सकळांचा ।"

हे प्रत्येक साईभक्ताने विसरून चालणार नाहीं. एक काळ असा होता की त्यावेळी आत्मसाक्षात्काराचा विचार करण्यासाठी संतांना भरपूर वाव मिळत असे पण आता परिस्थिती बदलली आहे. डोळ्यादेखत जनता होरपळत असता डोळे लावून ध्यान करणे ही भक्ति निष्ठा नव्हे हा दुष्टपणा ठरणार आहे.

"संत ते समय ओळखती वेळ"

हे संत वचन दृष्टीपुढे ठेऊनच यापुढे भक्ति प्रेमात गुंतलेल्या प्रत्येक भक्ताने वागले पाहिजे.

"न देखवे डोळा ऐसा हा आकांत ।
परपीडे चित्त दुःखी होते ।"

अशी भक्ताची, भाविकाची स्थिती झाली पाहिजे. तसेच त्याला जसा वाटेल तसा उपदेश त्याने समाजाला करीत सुटावे हा प्रकार आता बंद झाला पाहिजे.

"बोलणे ते आम्ही बोलो उपयोगी ।
पाडिले प्रसंगी काळा ऐसे ।।"

असा निर्धार सर्वांनीच केला पाहिजे. लोकोद्धाराचे बाशिंग बांधलेल्या संतांवर समाजाच्या सर्वांगीण उन्नतीची जबाबदारी नाहीं असे कोण बरे म्हणेल! समाजाला आपल्या जीवनातील दुःखे नाहिशी करण्याचे आणि आपली उन्नती करून घेण्याचे मार्गदर्शन जर संत लोकाकडून थोरा मोठ्यांकडून आणि तीर्थ क्षेत्रातून मिळणार नसेल तर त्यांचा काय उपयोग! कोणतेही धार्मिक क्षेत्र घ्या ते देवाचे

डोक्यावर बेलपत्री, फुले चढवणे, घंटे बडवणे व ऐश्यासारखे दिवसभर पोथी वाचत बसणे एवढ्याचसाठी नसते तर ज्या क्षेत्रातून समाजात सुव्यवस्था निर्माण केली जाते त्यालाच धार्मिक क्षेत्र असे म्हणतात असे आमचे मत आहे. या दृष्टिकोनातून आपल्या प्राचीन अर्वाचीन संत महंतांनी कार्य केले आहे आणि त्यांची परंपरा आता तशीच चालू रहाण्यासाठी, ठेवण्यासाठी आपण देखील झटले पाहिजे. तेव्हा शिरडीची परंपरा व महत्त्व यासाठी आपणच झटले पाहिजे, व श्रीसाईबाबांचे महात्म्य आपणच गाईले पाहिजे.

जनमानस समजावून घेऊन मनोवृत्ती निर्माण करण्याचे जे कार्य संत करीत असतात ते राजसत्तेकडून देखील होऊ शकत नाहीं. कायद्याच्या बळावर सरकार समाजाचे बाह्य नियंत्रण करते तर संत हृदयपरिवर्तनाद्वारे समाजाचे मार्गदर्शन व संचालन करीत असतात. त्यामुळे कायद्याने न होणाऱ्या गोष्टी संतवाणी करू शकते. कायदा अपुरा पडतो तेथूनच संतकार्याला सुरूवात होते. अर्थात् साईबाबांच्या सारख्या सर्व संतांनी एकाच धोरणाने प्रेरित होऊन समाजाला शिस्तबद्ध राखण्यासाठी प्रयत्न केले, अशा संतांचाच किंवा प्रत्येक संताच्या भक्ताने गिरविला पाहिजे, अवलंबिला पाहिजे म्हणजे समाजाचे तुकडे न होता समाजाला हवे तसे सुंदर रूप देता येणे शक्य होईल.

आजच्या समाजात उत्तम चारित्र्य निर्माण करणे हे आम्हां श्रीसाईभक्तांचे परम कर्तव्य आहे. पंथद्वेष, स्पृश्यास्पृश, जातीयता, अमानुष रूढ्या, स्त्रियांची गळचेपी व त्यांचेवरील अत्याचार, लग्नादिकार्यातील अपव्यय, गुंडांची जिथे तिथे शिरजोरी, खेड्यांची दुर्दशा इत्यादी दुःखदायी गोष्टी हर प्रयत्नांनी दूर करून समाजाची सर्वांगीण उन्नती करण्याचे कार्य आपण सर्व साईभक्तांनी चोखाळले पाहिजे तरच श्री बाबांनी आपल्या हयातीतून सर्वांना केलेला त्यांचा उपदेश आम्ही पाळला व त्यापासून आम्ही बोध घेतला असे म्हणता येईल. लोकांना वैराग्याच्या व मानवतेच्या बोधाने बुद्धीदान, धनदान, कलादान, श्रमदान इ. करण्यास आपण प्रवृत्त केले पाहिजे तसे झाले तर अल्प काळातच भारतात स्वर्गीय नंदनवन फुलू लागेल आणि पंढरीच नव्हे शिरडीच नव्हे तर सारा भारतदेश भूवैकुंठ बनेल.

# श्रीसाईलीला लेखक–कवी दहावे स्नेहसंमेलन शिरडी-१९८४

**– साईनन्द**

श्रीसाईबाबा संस्थान शिरडी या जगप्रसिद्ध संस्थेच्या श्रीसाईलीला या आंतरराष्ट्रीय सुकीर्तीच्या इंग्रजी व मराठी या मासिकातून सातत्याने लिहिणाऱ्या लेखक-कवींचे दशक महोत्सवी स्नेहसंमेलन रविवार दिनांक २९ व सोमवार दिनांक ३० जानेवारी १९८४ या दोन दिवशी शिरडी येथे भरविण्यात आले होते. १९७५ साली अशा स्वरूपाचे संमेलन प्रथमच भरविण्यात आले होते त्यावेळी फक्त २०–२५ लेखक कवी मंडळी कोणत्याही प्रकारचे बंधन नसताना हजर होती. पण तेव्हांपासून यंदाच्या वर्षापर्यंत ही परंपरा श्रीसाई कृपेने कायम आहे. यंदा १२० वर लेखक कवींचा मेळावा एकत्र आला व दोन दिवसांचा सुखद सोहळा सुव्यवस्थितपणे यशस्वी पार पडला.

श्रीसाईलीला मासिकातून गेल्या पाच वर्षात निदान तीन तरी लेख किंवा कविता ज्या साहित्यिक भक्तांच्या छापल्या गेल्या आहेत अशानांच यंदा निमंत्रण पाठविण्यात आले होते. श्रीसाईलीला दिवाळी १९८३ च्या अंकातच छापलेला तक्ता रितसर भरून डिसेंबर ८३ पर्यंत तो पाठवावा अशी भरपूर मुदतही साहित्यिक भक्तांना देण्यात आली होती तरीसुद्धा अगदी शेवटच्या तारखेपर्यंत मंडळींनी याबाबत पत्रव्यवहार केलाच.

यंदा हे संमेलन "श्रीसाई उद्यान" या नूतन भव्य सभागृहात घेण्यात आले होते. या सभागृहाच्या दालनात मुलायम गादीच्या बैठका दोन्ही बाजूस अंथरून स्त्री–पुरुष लेखक–कवींची सोय करण्यात आली होती. संमेलनास माजी अध्यक्ष या नात्याने साईसच्चरित्रकार हेमाडपंतांचे चिरंजीव डॉ. गजाननराव दाभोलकर, काकासाहेब महाजनींच्या इंदूरस्थ कन्या सौ. प्रभाताई मुळये हे दोनच माजी अध्यक्ष हजर होते. शिवाय इंदूरचे कै. जस्टिस रेगे यांच्या कन्या संस्कृत पंडिता कु. शांताताई रेगे, मद्रास येथील ऑल इंडिया साईसमाजाचे सध्याचे अध्यक्ष श्री. टी. केशवराव, त्या संस्थेचे चिटणीस श्री. विश्वनाथन, शिरडीचे श्री बोरावके ही पाहुणे मंडळी पण हजर होती.

या संमेलनास अध्यक्ष म्हणून हरदयाच्या (म. प्रदेश) कै. श्री. सदुभैया नाईकांचे चिरंजीव जे सध्या इंदूर येथे स्थायिक झालेले आहेत ते श्री. लक्ष्मणराव नाईक वय वर्षे ७६ हे होते. १९१३ साली त्यांनी बाबांना प्रथम पाहिले त्यावेळी ते ६–७ वर्षांचे होते. पुढे १९१८ सालापर्यंत त्यांनी बाबांचे अनेकदा दर्शनसुद्धा घेतले होते.

संमेलनास मुंबईहून सर्वश्री डी. आर. खडके, विजय हजारे, माधव गोरे, ग. रा. पालकर, राधाकृष्ण गुप्ता, अनिल रसाळ, विलास पडवळ, रमाकांत पंडित, मधुसूदन करवेळकर, प्रभाकर कोळमकर, लावणी सम्राज्ञी श्री. व सौ. आसावरी वायकूळ, कु. नीलम सांगलीकर, सौ. अस्मिता दांडेकर, शांताताई सरोदे, सौ. शकुंतला जगतकर, संजय परळकर, सूर्यकांत दळवी, गायक जयवंत कुलकर्णी, सौ. चौरे, वसंत प्रधान, श्री व सौ. बिपिन स्वादीया, डोंबिवलीहून श्री व सौ. कुमुदिनी टिळक, अंबरनाथहून श्री व सौ. शशिकांत रेवणकर, लोणावळ्याहून डॉ. सौ. इंदुमती खानविलकर, डॉ. कु. इंदुताई नाईक, राहुल खानविलकर, पुण्याहून र. श्री. पुजारी, मु. ब. निंबाळकर, द. म. मोरे, श्री व सौ. रघुनाथ सांडभोर, सौ. उषाताई मुळे, ज. ना. कुलकर्णी फोटोग्राफर, इंदूरहून श्री. गजाननराव निरखे, प्रकाश कर्पे, धुळ्याहून नागेश मोगलाईकर, लीलाताई मराठे, जगदीश देवपूरकर, नवापूरहून रमेशचंद्र चव्हाण, हसमुख पाटील, मधुकर मंडलीक, दोंडाईचाहून शिवाजीराव मोरे, पिंपरीहून डी. बी. पोतनीस, नागपूरहून सौ. सिंधुताई मुळीक, सौ. सिन्धु सणस, कोल्हापूरहून बाळासाहेब नाडकर्णी, बिदरहून डॉ. हिब्बारे, सौ. मथुराबाई हिब्बारे, प्रा. गुंडेराव पटवारी, बडोद्याहून मधुकरराव अंबाडे, टेकचंदानी, तऱ्हाळ्याहून दिलिप लांडे, नांदेडहून लक्ष्मणराव रापतवार, वर्ध्याहून अनिल लुतडे, भंडाऱ्याहून डॉ. मालती राहाटे, ग. दे. कुलकर्णी, रत्नाळ्याहून सुभाष वैष्णव, पनवेलहून गौरूराम उरणकर, साताऱ्याहून चंद्रकांत गरगटे, बैतुलहून प्रा. एच. बी. महाले, ए. पी. त्रिपाठी, गरखल येथून पी. एल. गोयल, चंदीगडहून आय. पी. मेहता, व ॲड. जुगलकिशोर पुरी, मद्रासहून आर. एस. रामकृष्णन, वारंगळहून मच्छिंद्र दास, बागलकोटहून चंदावरकरसाहेब, कानपूरहून सौ. व श्री. डॉ. बी. जी. दास, हैद्राबादहून गोकुळ गोपाळ, नवीनचंद्र, एम. नरसिंहराव, कझावादहून जे. आर. लरोइया, पोन्नापूरमहून डी. एल. कांताराव, चिकमंगळूरहून श्री. व सौ. विजयकुमार, मच्छलीपट्टणमहून सूर्यनारायणराव, अडोनी येथून एल. विरण्णा, धारवाडहून एस. बी. होसगुडार, हुबळीहून राधाकृष्णन, हसनकोंडा येथून डी. सत्यनारायण, जबलपूर येथून दिनानाथ गुप्ता व ठाण्याहून

सी. एच. तेरसी, शिरडीच्या लीला गुजराथी इ. मंडळी आलेली होती व त्या सर्वांची निवास, जलपान, भोजन इ. ची सर्वंती सोय संस्थानने अतिशय उत्तम प्रकारे ठेवली

या खेपेस संपूर्ण दोन दिवसांचा कार्यक्रम तयार करून तो छापून अगोदर प्रसिद्ध करण्यात आला होता व त्याप्रमाणे सर्व ते कार्यक्रम अगदी व्यवस्थित पार पाडले गेले. शनिवार ता. २९–१–८४ रोजी सकाळी ठीक नऊ वाजता या संमेलनाचे उद्घाटन "साईबाबा गणनायका, कृपा तुम्ही करा साई विनायका" या स्वागत गीताने झाले. सौ. आसावरी वायकूळ यांनी रचलेले हे गीत त्यांच्याच कंठातून तबला–पेटीच्या सुरेख साथीनं गाईले गेले. साथीला त्यांचे पती श्री. वायकूळ, चिरंजीव निनाद व शांतीलाल दवेजी ही मंडळी होती. नंतर या संमेलनाचे रितसर उद्घाटन व सर्व उपस्थित पाहुण्यांचे स्वागत मा. श्री. क. हि. काकरेसाहेब कोर्टरिसिव्हर श्री साईबाबा संस्थान शिरडी यांनी केले. या दोन्ही कार्यक्रमापूर्वी दालनात मांडलेल्या श्री. साईंच्या प्रतिमेची रितसर यथायोग्य पुजा करून प्रतिमेस पुष्पहार घालून व त्यांच्या समोर समईची अखंड ज्योत तेवत ठेऊन अध्यक्ष श्री. नाईक यांनी संमेलनाचे कार्यास सुरवात केली होती.

प्रथम श्री. सदानंद चेंदवणकर यांनी संमेलनाची रूपरेषा व दोन्ही दिवसांचा कार्यक्रम सांगितला. त्यानंतर श्री. र. शं. जुन्नरकर, सौ. तारा चेंदवणकर, मोहितेबाबा, आजीबाई बनारसे, वसंत सूर्यवंशी, सौ. सुमित्राबाई आपटे, श्री. गजाननराव दिवे, इ. दिवंगत साईभक्तांना मिनिटभर सर्वांनी उभे राहून श्रद्धांजलि वाहिली. यानंतर श्रीसाईलीलाच्या फेब्रुवारी १९८४ च्या श्रीसाईकाव्य बहार या खास अंकाचे व इंग्रजी–हिंदी आवृत्तीचे अध्यक्षांचे शुभहस्ते प्रकाशन झाले. ज्या कवींनी या अंकात हजेरी लावली होती व जे तिथे या प्रसंगी हजर होते अशा ३० कवींना अध्यक्षांचे शुभहस्ते अंकाची भेटप्रत व प्रसादरूपी पुरस्कार ही देण्यात आला. यानंतर उपस्थित मंडळींना आपापला परिचय करून देण्याची मिनिटभर संधी देण्यात आली. येथवर दुपारचे बारा वाजले होते. लगेच दुपारच्या कार्यक्रमाची रूपरेषा व सूचना सांगण्यात येऊन मंडळी श्रींच्या दुपारच्या आरतीला गेली.

आरतीनंतर प्रसादग्रहण. विश्रांती होऊन दुपारी ठीक ३ वा. सर्व मंडळी दुपारच्या सत्रातील कार्यक्रमांना सभागृहात हजर झाली. यावेळी 'श्रीसाईलीला

बद्दल मला काय वाटते व 'साईलीलाचा आणखीन विकास कसा करता येईल" हे दोन प्रमुख विषय विचार मंथन व खुल्या चर्चेसाठी म्हणून ठेवण्यास आले होते.

सुरवातीस मद्रासचे श्री. आर. एस. रामकृष्णन यांना त्यांनी मद्रास येथे 'गुड बुक्स पॅरेडाइज' या नावाने धार्मिक व अध्यात्मिक पुस्तकांचे एक प्रदर्शन मद्रास येथे १०–१२ दिवस भरविले होते. या प्रदर्शनात जगातील या विषयावरची मिळतील ती विविध भाषांतील पुस्तके महाप्रयासाने उपलब्ध करून ती या प्रदर्शनात मांडली होती. दक्षिणेकडील सुविख्यात तत्त्ववेत्या श्री. शांताम्मा यांनी या अपूर्व प्रदर्शनाचे उद्घाटन केले होते. मद्रासमधील वृत्तपत्रांनी या प्रदर्शनाची मुक्तकंठाने स्तुती करून हजारो भक्तीमार्गातील मंडळींनी हे प्रदर्शन बघितले. या प्रदर्शनाची साद्यंत हकीकत सांगण्यासाठी श्री. रामकृष्णन यांना १०–१५ मिनिटांची संधि देण्यात आली होती.

या कार्यक्रमानंतर कवी–लेखक वक्त्यांच्या सूचनांच्या भाषणांना सुरुवात झाली. प्रथम बैतुलचे प्रा. ए. पी. त्रिपाठी यांनी श्रीसाईलीला मध्ये हिंदीला उचित स्थान मिळाले पाहिजे. १६ पाने इंग्रजी आवृत्तिमध्ये अगदीच अपूरी आहेत तेव्हां हिंदी संपूर्ण आवृत्ती निघावी अशी सूचना केली. तसेच श्रीसाईलीला अंकावरचे नाव–पत्याचे वेष्टन आणखीन थोडे जाडसे असावे म्हणजे कित्येकदा अंक व वेष्टन निरनिराळे झालेले–फाटलेले अवस्थेत पोचणार नाहीत याकडे लक्ष वेधले. त्यांच्या सूचनेप्रमाणे धुळ्याचे श्री. नागेश मोगलाईकर यांनी संपूर्ण हिंदी आवृत्ती श्रीसाईलीलाची असावी अशी जोरदारपणे सूचना मांडली. नवापूरचे श्री. हसमुख पाटील यांनी काव्यबहार व स्वानुभव विशेषांक वर्षातून दोनदा काढावेत तसेच हिंदी व इंग्रजी आवृत्तीचेही स्वानुभव काव्यबहार विशेषांक प्रसिद्ध व्हावेत अशी सूचना मांडली. श्रीसाईलीला मराठी मासिकातील लेखांच्या अनुक्रमणिकेस इंग्रजी आवृत्तीप्रमाणे पृष्ठक्रमांक दिले जावेत त्यामुळे कोणताही लेख किंवा कविता ताबडतोब सापडण्यास मदतच होईल. इंग्रजी आवृत्तीमधील हिंदी विभाग अत्यंत उपेक्षित आहे म्हणून साईलीलाची संपूर्ण स्वतंत्र हिंदी आवृत्ती निघालीच पाहिजे अशा सूचना केल्या. प्रा. र. श्री. पुजारी यांनी साईलीलाच्या प्रत्येक अंकात साईसच्चरित्राचा एक–एक अध्याय छापला जावा यामुळे साईसच्चरित्राची जी वाढलेली किंमत आहे व ती भक्तांना इच्छा असूनही ती पोथी एकदम घेता येत नाहीं अशा भक्तांची निश्चितच सोय होईल. ५३ अंकात ५३ अध्याय पूर्ण होऊन ते बांधून जर घेतले तर अशा गरजू भक्तांची चांगली सोय होईल असे विचार

प्रगट केले. प्रा. गुंडेराव पटवारी यांनीही हिंदी आवृत्ती निघावी अशी मागणी केली. श्री. अनिल रसाळ यांनी इंग्रजीतून श्रीसाईलीलाच्या विकासासंबंधी आपले विचार प्रगट केले. मद्रासचे श्री. टी. केशवराव व श्री. विश्वनाथन यांनी मराठी व इंग्रजी आवृत्तीतील संपादकीय लेख इतके सुरेख असतात की सर्व चांगल्या संपादकीयांचे एक पुस्तकच तयार करावे त्यामुळे साईविषयक इतर मासिकांना उत्कृष्ट मार्गदर्शन मिळेल असे विचार प्रदर्शित केले. श्री. प्रकाश कर्पे, बापूसाहेब निरखे, राधाकृष्ण गुप्ता, गोकुळ गोपाल यांनी पण हिंदी आवृत्ती आता प्रकाशित व्हावी याला जोरदार पाठिंबा दिला. लोणावळयाच्या डॉ. सौ. सुमती खानविलकर यांनी या जगात कर्तव्य हे श्रेष्ठ आहे असे सांगून त्या म्हणाल्या की आपले सारे दुःख पाठीशी घालून चेंदवणकर पिता–पुत्र आपल्या संमेलनाच्या कार्याला पूर्वीच्या हिरीरीने लागले आहेत व येथे कार्यभाग उरकीत आहेत याबद्दल त्यांना धन्यवाद. बाबांच्या ओढीने आपण सारेजण भारावून जातो व वर्षभर श्रीसाई-लीलाच्या रूपाने शांती आपणाला लाभते. आपण सारेजण बाबांची लेकरं आहोत व ही अशी संमेलने कायम स्वरूपात चालू रहावीतच. श्रीबाबांचा प्रसाद म्हणून जे छोटे छोटे वाराचे कपडे असतात जे समाधीवर रात्रभर राहून पुनीत झालेले असतात ते आम्हांला यापुढे प्रसाद म्हणून मिळावेत. हैद्राबादचे श्री. नवीनचंद्रजी म्हणाले की म्हाळसापती भगत यांचे चिरंजीव मार्तंडमहाराज सध्या आजारी आहेत त्यांना आता संस्थानकडून वैद्यकीय मदत दिली जावी असे सुचविले.

यानंतर सर्वश्री रघुनाथ सांडभोर, परमानंद टेकचंदानी, जुगलकिशोर पुरी, यांची भाषणे झाली. पुढे धुळयाचे जगदीश देवपूरकर यांनी साईलीला मधले सोनेरी एक पान (सौ. तारा चेंदवणकर) आम्ही सर्व हरवून बसलो आहोत म्हणून हळहळ व्यक्त केली. प्रा. गुंडेराव पटवारींनी साईलीलामुळेच आपण मराठी लिहू–बोलू–वाचू लागलो आहोत असे सांगितले, चिकमंगळूरचे विजयकुमारजी यांनी मासिकाच्या वार्षिक वर्गणीत आणखीन वाढ करावी असे सुचविले. सौ. लीलाताई मराठे धुळे यांनी ज्यांनी आम्हांला प्रेम दिले त्या सौ. ताराबाईंच्या प्रेमाचे आता कायमचे पारखे झालो आहोत असे गहिवरून सांगितले. अंक गहाळ होण्याचे प्रमाण वाढलेले आहे. कित्येकांना २–२ प्रती मिळतात तर कित्येकांना एकही प्रत मिळत नाहीं हे कसे काय याचा शोध–तपास लावावा असे सांगितले. त्यानंतर श्री. डी. पी. सत्यनारायण, विजय हजारे, मधुकर मंडलीक, अनील लुतडे, आय. पी. मेहता डॉ. हिब्बारे, बिपिन स्वादिया यांची भाषणे झाली. शेवटी कुमार राहुल खानविलकर याने मासिकात मुलांसाठी दरमहा एक पान तरी असावे अशी मागणी केली.

येथपर्यंत संध्याकाळचे सहा वाजून गेले होते व त्यामुळे भक्तमंडळी श्रींच्या आरतीला मंदिरात गेली. रात्री भोजन–प्रसादानंतर अनेकांनी दरबारात आपापली काव्यहजेरी सादर केली. या कार्यक्रमाचे संयोजन सौ. सुमती खानविलकर यांनी केले होते.

संमेलनाचे दुसरे दिवशी सोम. ता. ३० रोजी सकाळी ९ वाजताच सर्व मंडळी पुन्हा जमली व तिसऱ्या सत्राच्या कार्यक्रमास सुरुवात झाली. साईलीलाचा विकास आणखीन कसा साधता येईल या कालच्याच विषयावर मुंबईचे सर्वश्री. खडके, वारंगळचे श्री. एन. मछिंद्रदास धारवाडचे श्री. होसगुडार यांनी आपापले विचार प्रगट केले. प्रचार कार्यासाठी मासिकाच्या काही प्रती विनामूल्य द्याव्यात असे होसगुडारजी म्हणाले. बागलकोटचे आय. ए. एस. अधिकारी चंदावरकरजींनी श्री बाबांसंबंधीचे आपले काही अनुभव कथन केले.

यानंतर श्रीसाईलीलासाठी कसे लिहाल यावर सदानंद चेंदवणकर कार्यकारी संपादक मराठी आवृत्ती यांनी माहितीपूर्ण व मार्गदर्शनपर भाषण करून सुयोग्य प्रकारे लेखन पाठविण्यासंबंधी आवाहन केले. आपल्या भाषणाबरोबर त्यांनी लेखक भक्त मंडळी कशा प्रकारचे लेखन करतात व त्यांचे लिखाण कसे बाद ठरविले जाते, का परत पाठविले जाते हे पुराव्यासहित दाखवून दिले. त्यामुळे भावी लेखकांना त्यांच्या भाषणाचा खूपच उपयोग झाला. भाषणातून त्यांनी छापखान्याच्या कामकाजाची व कार्यालयाच्या व्यवस्थेसंबंधी माहिती पण दिली ती सर्वांनाच उपयुक्त वाटली.

येथवर ११ वाजले होते त्यामुळे राष्ट्रपिता म. गांधीजींना व हुतात्म्यांना श्रद्धांजली मिनिटभर उभे राहून वाहिली गेली. यानंतर माजी अध्यक्षा सौ. सरोजिनी मुळे, कु. शांताताई रेगे, यांची भाषणे झाली चहापान इ. आटोपेपर्यंत १२ केव्हांच झाले व सारेजण बाबांच्या आरतीला रवाना झाले आरतीनंतर प्रसाद विश्रांती झाल्यावर दुपारी ठीक २ वा. ४ थ्या अखेरच्या सत्राच्या कार्यक्रमास सुरुवात झाली.

सुरुवातीला सौ. आसावरी वायकूळ यांनी दोन भक्तिगीते म्हटली व एकदोन भक्तांची छोटीशी भाषणे झाल्यावर अध्यक्ष महोदय श्री. लक्ष्मणराव नाईक आपल्या अध्यक्षीय भाषणासाठी उभे राहिले ते म्हणाले —

## अध्यक्ष श्री. लक्ष्मणराव नाईक यांचे भाषण :-

आदरणीय साईभक्त,

आज मला या समारंभ प्रसंगी आपल्या सारखाच परंतु श्री साईबाबांस प्रत्यक्ष पाहिलेला व माझ्यावर आणि माझ्या परिवारावर बाबांचा सतत वरदहस्त राहिला, अशा साईभक्तास कार्यकारी मंडळाने दहाव्या काव्य, लेखक संमेलनाचे अध्यक्षस्थान स्वीकारण्याची विनंती संपादक महाशयांनी केल्याने मी आपणासमोर उपस्थित झालो आहे. हे मी माझे परम सौभाग्य समजत आहे. माझा भाषण करण्याचा हा पहिलाच प्रसंग आहे व या बाबतीत मी अगदीच नवखा आहे. माझी आपणास हीच विनंती आहे की मी आपणासमोर जे चार शब्द ठेवीत आहे ते आपण व श्री साईबाबा यांनी गोड मानून घ्यावेत. मला असा विश्वास वाटतो की माझा हा प्रयत्न आपण गोड मानून घ्याल.

मला श्री. साईबाबांस दोन वेळा प्रत्यक्ष पहाण्याचा योग आला. त्यापैकी प्रथम म्हणजे सुमारे सन १९१४ साली. त्यावेळी मी अगदीच लहान म्हणजे ७-८ वर्षांचा असेन. त्यानंतर पुढल्याच वर्षी म्हणजे सन १९१५ मध्ये माझ्या वडिलांबरोबर डिसेंबर महिन्यात गेलो होतो. त्यावेळची शिरडी व श्री साईबाबांना पाहिल्याची आठवण आजही इतक्या वर्षानंतर माझ्या मनांत ताजी आहे. मी व लहान भाऊ शंकर दुपारी श्रीबाबांजवळ बसून हात पाय दाबीत असू. चावडीचे दिवशी आम्ही राधाकृष्णा आईकडे जात असू. त्या आम्हांस कपाळावर पांढऱ्या चंदनाच्या मुद्रा लावून हातात मोर्चले देवून पालखीपुढे चालण्यासाठी पाठवित. त्यावेळी मी व माझा धाकटा भाऊ दहा बारा दिवस शिरडीस होतो.

शिरडीस त्यावेळी जाण्यासाठी घोडयाचा टांगा हेच मुख्य साधन होते. माझे वडील कै. सदुभैया नाईक हे बाबांचे निस्सिम भक्त. बाबांवर त्यांचा अतूट विश्वास. ते नेहमी शिरडीस जाऊ लागले, त्यामुळे घरात दुर्लक्ष होऊ लागले. माझ्या आजीने अखेरीस श्री. माधवराव देशपांडयांकडे तक्रार केल्याने त्यांनी वडिलांस कळविले की श्री बाबांनी बोलावल्या शिवाय तुम्ही शिरडीस येऊ नये, अशी श्रींची आज्ञा आहे. पत्र वाचून वडिलांची अतिशय निराशा झाली. परंतु थोडयाच दिवसात माधवरावांचे पत्र आले की श्री साईबाबांनी आपली आठवण केली असून शिरडीस बोलावले आहे. पत्र येताच वडील शिरडीस गेले. त्यांस पहाताच श्री बाबा त्यांस म्हणाले की अरे सदाशिव, तू माझ्यावर रागावलास की

काय? तुला मी येण्याचे नाहीं म्हटलेले नाहीं. पण आता मीच तुझ्या घरी येऊन राहीन. त्याप्रमाणे श्री साईबाबांनी आपला एक मोठा फोटो (चावडीत आहे तसा) श्री भक्त बाळकराम व भुक्ताराम ह्यांच्या बरोबर आमचे घरी सन १९१५ चे श्री रामनवमीच्या दिवशी पाठविला. फोटो आल्यापासून शिरडी प्रमाणे आरती पूजा होऊ लागली. संध्याकाळीं आरतीच्या वेळी भक्त मंडळी श्री. परुळकर व इतर वडिलांचे मित्र येत असत. अशी सेवा श्री बाबांनी सन १९३४ पर्यंत हरद्यास घेतली, पुढे वडिलांचे मृत्युनंतर तो फोटो माझ्या घरी इन्दोरला आणला, आणि आजही माझ्या घरी तो पुजेत आहे. श्री बाबांचे मला अनेक अनुभव आले आहेत. सन १९१६ मध्ये हरद्यास प्लेगची साथ आली त्यावेळी श्री साईबाबांनी परीक्षा म्हणून वडिलांस शिरडीस बोलावून घेतले. परंतु एक मोठा फोटो हरद्यास ठेवून मुलाबाळांस गावी पाठवून पूजा आरती हरद्यास करावी असे पत्र आल्याने त्या पत्राप्रमाणे वडील सकाळी बैलगाडीने हरद्यास पूजेकरिता येत. नंतर आठ दिवसांनी वडिलांस श्री. बाबांनी शिरडीस बोलावून घेतले. त्यानंतर आम्ही बंधू रोज सकाळी बैलगाडीने हरद्यास पूजेकरिता येत असू व संध्याकाळी आरती करून परत गावी जात. वडिलांनी हरद्यास जाण्याबद्दल शामास सांगितले. श्यामाने बाबांस विचारले की सदुभैया हरद्यास जाऊ इच्छितात. त्यावर बाबा म्हणाले की तो इतक्यांत कसला जातो उदी पाठवून दे अल्ला सर्व चांगले करील. उदी पाठवून बाबांचे म्हणणे आम्हांस कळवून एक महिन्या नंतर प्लेग संपल्यावर हरद्यास आले. ह्या अवधित आम्हांस कोणासही कसलाच त्रास झाला नाहीं.

मी इंदोरास असता लहान भावाचे मृत्युनंतर बाबांचा प्रासादिक फोटो आमच्या शेतीच्या गावी पडून होता. तेव्हां श्री. बाबांनी स्वप्नात येऊन सांगितले कि माझ्या पायास (दिमक–वाळवी) व्हाईट अँट लागले आहे त्या दूर कर. मी दुसऱ्या दिवशी गावीं जाऊन पाहिले तेव्हां बाबांच्या फोटोस खूपच व्हाईट अँट लागले होते, पायाच्या अंगठ्यापासून गुडघ्यापर्यंत पोहोचले होते. मी तो फोटो खालील सर्व कीड साफ करून फोटो हरद्यास आणला. इन्दोरास आल्यावर नवीन फ्रेम केली साईभक्तांस या घटनेची माहिती होताच अनेक मंडळी माझ्या घरी तो फोटो पहाणेस आली चमत्कार असा की एवढी कीड लागूनही फोटोचे काहीच नुकसान झाले नाहीं, फक्त गुडघ्याचे खाली एक पांढरा डाग आहे तेवढाच. त्यावरून आजही त्या घटनेची आठवण मनामध्ये ताजी आहे

असे अनेक अनुभव श्री॰ बाबांचे बाबतीत निरनिराळ्या सुखदुखाच्या प्रसंगी साईभक्तांना आले आहेत श्री साईलीला मासिकांत असे उत्कट अनुभव आपणही

वाचले असतीलच साईबाबांचा उपदेश व गुरुमंत्र म्हणजे श्रद्धा व सबुरी. श्री साईबाबांनी कानमंत्र किंवा गुरुमंत्र कोणालाही दिला नाहीं. बाबांनी आपल्या गुरुंना दोन पैसे दिले ते म्हणजे श्रद्धा व सबुरी त्यांचे सांगणे हेच असे की आपल्या गुरुच्या ठिकाणी कुलदेवतेस माना व त्यांच्याच रूपात मला पहा• मी तुम्हांला तेथेच सापडेन. मुळचे शास्त्रींना श्री घोलप स्वामींचे दर्शन बाबांनी मशिदित करविले ह्याचा अर्थ हाच की आपले इष्ट देव कोणीही असोत त्याचेवर निःस्सिम श्रद्धा ठेवून फळाची अपेक्षा न करता आपले कर्तव्य करा, बाबा आपल्या पाठीशी उभे आहेत ही श्रद्धा ठेवली तर श्री बाबा आपल्या इच्छा आकांक्षा पूर्ण करतील, सबुरी ठेवली पाहिजे, हाच बाबांच्या शिकवणुकीचा मला अनुभवास आलेला अर्थ,

संस्थेने मला आज हा बहुमान दिला त्याबद्दल मी सर्व साईभक्तांचा आभारी आहे तसेच श्री साईबाबांचाही ऋणी आहे.

हे अध्यक्षस्थान भूषविण्यासाठी माझे ज्ञान व भक्ती फारच तोकडी आहे असे मला वाटते. तरीही आपण मला हा मान दिला व माझे चार शब्द गोड मानून घेतले याबद्दल मी पुन्हा एकवार आपले आभार मानतो. शेवटी एकच नम्र विनंती करावीशी वाटते ती ही की श्री साईबाबांचे वेळचा व शिरडीचा जो जो इतिहास आज ज्ञात आहे तो जीवापाड जपला पाहिजे, नष्ट होता कामा नये, कारण येत्या नवीन पिढ्यांसाठी तो इतिहासच श्रीबाबांचे ठिकाणी मार्गदर्शक व प्रेरक आहे

बाबांचे चरणी शतवार नम्र वंदन करून आपली भक्तमंडळींची रजा घेतो·

जय श्री साईराम

अध्यक्षीय भाषणानंतर नवापूर धुळे येथल्या भक्तांनी पुढाकार घेऊन अध्यक्ष, न्यायालयधारक व संपादक यांचा भेटवस्तू देऊन सत्कार केला. व त्यानंतर नवापूर येथे अगदी नजिकच्या काळात अशाच प्रकारच्या संमेलनाची योजना आखत आहोत त्यासाठी सर्वांनी हजर रहावे अशी विनंती केली. श्री जगदीश देवपूरकर यांनी सौ तारांबाई चेंदवणकर यांच्या स्मृती प्रित्यर्थ एक काव्यस्पर्धा आयोजित करून त्या प्रित्यर्थ एक फिरती ढाल दरवर्षी ठेवली जाईल यासंबंधीची माहिती सांगितली व फेब्रु ८४ पर्यंत काव्य पाठविण्यासाठी आवाहन केले. डॉ

दाभोलकरांनी आपल्या बरोबर आणलेल्या काही दुर्मिळ छायाचित्रांचेही दर्शन भक्तांनी या संमेलन प्रसंगी घेतले. श्री मधुकरराव अंबाडे, बडोदा यांनी संमेलन स्थानी संमेलनासंबंधीची केलेली कविता त्यांनीच वाचून दाखविली. पिंपरीचे श्री डी. वि. पोतनीस यांनी सौ. तारा चेंदवणकर यांचेवर वाहिलेली श्रद्धांजलीची कविता सौ. रेवणकर यांनी वाचून दाखविली. नंतर प्रा पुजारी, नागेश मोगलाई-कर व जुगलकिशोर पुरी यांनी संमेलन यशस्वीपणे पार पडल्याबद्दल संयोजकांचे आभार मानले. महिला वर्गातर्फे डॉ सुमन खानविलकर यांनी आभार प्रदर्शित केले व दरवर्षी हे संमेलन कायम स्वरूपात असले पाहिजे अशी सदिच्छा प्रदर्शित केली

यानंतर मा. कोर्ट रिसिव्हर श्री काकरे भाषणास उठले त्यांनी दोन वर्षापूर्वी संमेलन आणि माझ्या पहिल्या चिरंजीवाचा विवाह व यंदासुद्धा संमेलन आणि माझ्या दुसऱ्या चिरंजीवाचा विवाह हा योगायोग सांगितला. १९७८ साली आपण संस्थानचा कारभार हाती घेतला व त्या वर्षापासून आजतागायत श्री साईलीलाच्या लेखक–कवींचा दरवर्षी हा मेळावा भरत आलेला आहे हे मी पहातो व त्याबद्दल मला आनंद वाटतो. या मेळाव्याकडे मी स्नेहसंमेलन या दृष्टीने बघत आलो आहे असे उद्गार काढले. भाषणानंतर त्यांनी संमेलनाचे अध्यक्ष श्री नाईक यांचा शाल, श्रीफळ व हार घालून संस्थानतर्फे सत्कार केला. यानंतर डॉ. श्री. दि. परचुरे साईलीला इंग्रजी आवृत्तीचे का. संपादक यांनी संयोजक व लेखक–कवी या सर्वांचेच आभार मानले. कार्यालय अधिक्षक डी. सी. पाठक साहेब यांनीही संमेलन यशस्वीपणे पार पाडल्याबद्दल भक्तांचे आभार मानले. यानंतर ठिकठिकाणाहून आलेल्या लेखक–कवींचा संस्थानतर्फे प्रसाद, श्रीफळ व हार अध्यक्षांचे हस्ते देऊन सत्कार करण्यात आला. या प्रसादाबरोबरच दिल्लीच्या वेस्ट एण्ड टॉकीजचे साईभक्त मालक श्री. आर. एस. चिटणीससाहेब यांनी पाठविलेली श्रीसाई प्रतिमेची कॅलेंडरे भेट व छोटेखानी मेजदिनदर्शिकाभेट, माटुंग्याचे साईभक्त श्री. रमाकांत पंडित यांनी स्वतःच्या काव्य संग्रहाची सुंदर प्रत, मद्रासचे श्री. आर. एस. रामकृष्णन यांनी आर्ट पेपरवर भेटी दाखल दिलेले श्री शंकराचार्यांचे बहुरंगी चित्र, गणपती कलर कंपनी, मद्रासचे श्रीबाबांचे बहुरंगी कॅलेंडर व गरखलच्या श्री. गोयलांनी दिलेले बाबांचे कॅलेंडर अशा भेटवस्तू पण देण्यात आल्या यानंतर धुळ्याचे श्री. नागेश मोगलाईकर यांनी रचलेले 'निरोपक्षण' हा समीप आला निरोप घ्यावा कसा' हे निरोपगीत सौ. आसावरी वायकूळ यांनी अतिशय भावविवश होऊन गाईले, व दोन दिवसांचा हा लेखक–कवी भक्तांचा

सुखद सोहळा संपला. सायंकाळी भोजन, आरती, दरबारात हजेरी, हे कार्यक्रम झाल्यावर दुसरे दिवशी सकाळी १२ वाजेपर्यंत आलेली मंडळी परतली. याखेपेसही संस्थानने निवास, भोजन, चहापान इ. ची व्यवस्था अगदी चोख ठेवली होती.

## — हे तर नव्हे केवळ संमेलन —

(श्री. अंबाडे यांनी संमेलनात रचलेली व गाईलेली कविता)

हे तर नव्हे केवळ संमेलन ।
हे तर साईचे आशीर्वचन ।।धृ.।।

न घेई कुणी मान पान ।
असो तो थोर वा सान ।।१।।

चित्त हे सकळांचे प्रसन्न ।
सदाचो घेई साई ज्ञान ।।२।।

नित्यची करिता साई—गान ।
होई ज्ञानाचे संवर्धन ।।३।।

× × ×

शिरडी क्षेत्री संमेलनाचा साई हाची विधाता ।
साक्षरूपाची नम्रता ही समता, ममता, सहिष्णुता ।।१।।

भिन्न भाषा, भिन्न जाती, भिन्न धर्म—राष्ट्रता ।
एकत्रिले सारे कैसे नाही चिसी भिन्नता ।।२।।

खरा धर्म हा, खरा मर्म हा, हीच खरी ती मानवता ।
मानव—मानव एक असे हया साईभक्तांच्या चित्ता ।।३।।

जगामाजी चालली असता घरोघरी मतभेदता ।
भक्तांचीही विशेषता आदर्श अनुपम बंधुता ।।४।।

गाता गाता साईगाथा भक्ता विसरता देहता ।
साक्षात्काराचीच प्रचिती नित्यची देई साईमाता ।।५।।

श्री. मधुकर अंबाडे, बडोदे.

# प. पू. मोहितेबाबा आणि पालखी

—श्री. श्रीराम सातर्डेकर
१८–२ विजित निवास,
गोखले सोसायटी लेन,
परळ, मुंबई १२.

० दि ३ आणि ४ डिसेंबर रोजी साईभक्तांचे वार्षिक सम्मेलन राजा-शिवाजी विद्यालय दादर येथे आयोजित केले होते त्यानिमित्त मंगळवार दि २९ नोव्हेंबर रोजी कार्यक्रम पत्रिका लावण्यासाठी कार्यकारी सभासदां बरोबर मी निघालो. श्री सिद्धिविनायक प्रभादेवी येथे पत्रिका लावून आम्ही वरळी येथे परमपूज्य श्री मोहितेबाबा यांच्या साईमंदिरात आलो. श्री मोहितेबाबा मंदिरात बसलेले होते मला पाहताच त्यांनी "पोरा" किती दिसांनी आलास? कारण ३ वर्षापूर्वी गुढीपाडव्या दिवशीच त्यांनी माझा भक्तिगीतांचा कार्यक्रम आपल्या साईमंदिरात आयोजित केला होता. पण त्याच दिवशी माझ्या धाकट्या बंधूंचे देहावसान झाल्यामुळे मला कार्यक्रम करणे शक्य झाले नाहीं त्याची त्यांना आठवण असावी कारण लगेच म्हणाले की, आता तुझे गाणे कधी ऐकवणार आहेस? मी त्यांना म्हणालो की, बाबा! रामनवमी, गुरुपौणिमा, आणि दसरा हे तिन्ही बाबांचे उत्सव सोडून आपण मला केव्हांही बोलवा. कारण या तिनही उत्सवात मी शिरडीस असतो गेली ३८ वर्षे ही सेवा घडत आहे त्यावर बाबा म्हणाले लौकरच बोलाविन. त्यानंतर मी त्यांना रविवारी संमेलनास हजर राहाण्या-विषयी विनंती केली. मी असा थकलो आहे मला जर कोणी घेवून जाणारा असल्यास मी अवश्य येईन' त्याप्रमाणे मी त्यांना रविवारी येण्याचे आश्वासन दिले. आनंद झाला, आणि माझी नजर आम्ही बसलो होतो त्या छताकडे गेली तिथे (पालखी) बांधून ठेवलेली होती. आम्हांला पालखीची अत्यंत जरुरी होती. शनिवारी ३ डिसेंबर रोजी सायंकाळी ५॥ वाजता साई निकेतनमधून बाबांच्या प्रतिमेची पालखीतून मिरवणूक निघणार होती. परंतु आयत्यावेळी पालखी देणाऱ्या व्यक्तिनी पालखी देण्याचे नाकारले होते. मी सहज बाबांना म्हणालो. बाबा! तुमच्याकडे एक मागणे आहे. बोल, बेटा बोल. तुमची पालखी आम्हांला शनिवारी पाहिजे. इतके म्हणताच ते हंसले आणि म्हणाले कसली माझी पालखी बाबांची आहे. बाबांसाठीच पाहिजे, घेवून जा. त्याप्रमाणे आम्ही शनिवारी येवू

म्हणून सांगितले. तेव्हां बाबा म्हणाले शनिवारी पालखी न्याच! पण गुरुवारी सायंकाळी आरतीसाठी अवश्य हजर रहा.

बाबांचे कार्य आहे. तरी गुरुवारी सर्वांनी अवश्य या. आम्हांला श्रीफळ फोडून प्रसाद दिला आणि गुरुवारची आठवण दिली परंतु विधीलिखित वेगळेच होते. बुधवारी दिनांक ३० डिसेंबर रोजी सकाळी ५॥ वाजता बाबांची आरती करीत असतानाच ते अनंतात साईचरणी विलीन झाले. ही दुःखद बातमी आम्हांस गुरुवारी सायंकाळी ४ वाजता समजली त्वरीत आम्ही सायंकाळी वरळी येथे गेलो. परंतु दुपारी १ वाजताच निर्वाण सोहळा संपला होता. त्यांचे अंत्य दर्शन घडले नाहीं म्हणून आम्हां सर्वांना अत्यंत वाईट वाटले. ७ वाजतां आरती सुरू झाली. त्यावेळी सर्व भाविकांच्या डोळ्यांतून अश्रुधारा वाहत होत्या. आम्हांला गुरुवारीच आरतीला बोलावण्याचा उद्देश काय असावा? कारण त्या दिवशी विश्वास्तांपैकी प्रमुख व्यक्ति हजर असतील आणि मी नसलो तरी कोणतीही आडकाठी न येता तुम्हांला पालखी मिळेल त्याप्रमाणे आम्ही कार्यकारी मंडळास विचारताच ताबडतोब संमति दिली गेली. बाबांनी शब्द दिला आहे. आपले झालेले बोलणे आम्ही ऐकले आहे, तरी आपण, पालखी शनिवारी आनंदाने घेवून जा! त्यानुसार आम्ही शनिवारी पालखी आणून बाबांच्या आशिर्वादाने श्रीसाईबाबांच्या पालखी मिरवणूकीचा सोहळा आणि साईभक्तांचे सम्मेलन यशस्वी रित्या पार पडले. इथे बाबांचे बोल आठवतात ! ...

"जरी हे शरीर गेलो मी टाकून
तरीही मी धावेन भक्तांसाठी"

※ ※

## नांदा सौख्य भरे

श्रीसाईलीलाच्या लेखिका सौ. शांताबाई सरोदे यांचे ज्येष्ठ पुत्र चि. सुनिल यांचा विवाह चि. सौ. कां. लता – श्री. गणपतराव डोईजोडे डोंबिवली यांची कन्या इज बरोबर शुक्रवार ता. १७–२–८४ रोजी सायं. ५–२० वा. लक्ष्मीनारायण बाग, बाळ गोविन्ददास रोड, माहिम येथे थाटात साजरा झाला. वधूवरांचे अभिष्टचिंतन.

# शाश्वत धर्मगोत्रा सनातन पुरुष

—श्री. अनंत जयदेव चितांबर.
दिल्ली दरवाजा जवळ, अहमदनगर

० श्रीमद्भगवद्गीतेच्या ११ व्या अध्यायात श्रीकृष्णांनी आपले परमात्मा विराट स्वरुप अर्जुनास दाखविले. ते विराटस्वरुप पाहून त्या विश्वरुप विराट स्वरुपाची वर्णनपूर्वक प्रार्थना केली. त्यात १८ व्या श्लोकात "त्वमव्ययः शाश्वत-धर्मगोहत्रा सनातनस्त्वं पुरुषो मतो मे" असे परमात्म्याचे वर्णन केले आहे. त्या ईश्वराला अर्जुनाने अविनाशी, शाश्वत धर्माचा संरक्षक आणि सनातन म्हणजे नित्य असणारा पुरुष म्हटले आहे.

ईश्वर शाश्वतधर्माचा संरक्षक आहे या वर्णनात 'सनातन धर्म' असा शब्द-प्रयोग न करता 'शाश्वतधर्म' हा शब्दप्रयोग असून ईश्वराला 'सनातन पुरुष' हा शब्द वापरला आहे, यातील रहस्य परमेश्वरास ओळखावयाचे असेल तर लक्षात घेतले पाहिजे.

ईश्वर प्राप्तीचा धर्म एकच असून तो शाश्वत म्हणजे कधीही नष्ट होणारा नव्हे. धर्माचे अंतिम कार्य व ध्येय ईश्वर प्राप्तीच आहे. त्याच एका ध्येयासाठी 'एकं सत् विप्राः बहुधा भवन्ति' म्हणजे एकच असणारे सत्य निरनिराळ्या प्रकारांनी ब्रम्हवेत्ते वर्णन करतात. श्रीरामकृष्ण परमहंसांचा अवतार हेच सत्य पटवून देण्यासाठी झाला व त्यांनी त्यांचा पट्टशिष्य स्वामी विवेकानंद यांनाही याच सत्याचा प्रचार जगभर करण्याचा आदेश दिला. ह्या आदेशाप्रमाणे स्वामी विवेकानंद यांनी जगभर हिरिरीने निर्भयपणे एकनिष्ठेने प्रचार करून गुर्वाज्ञेचे परिपालन केले. ही आम्हां भारतीयांना अतिशय भूषणावह गोष्ट आहे.

त्या विराटरुपी परमेश्वराने 'श्रीसाईनाथ' रूप घेऊन (अवतार घेऊन) शाश्वत धर्माचेच संरक्षण केले आहे. ते कसे हे जाणून घेण्यास प्रथम अंतःकरण असूयारहित झाले पाहिजे. सर्व प्राणीमात्रांचा ईश्वर—नुसत्या मानव जातीचाच नव्हे — ईश्वर हा एकच आहे. ही बुद्धि अंतःकरणात वसत असेल तरच मानव हे समजू शकेल. हिंदुंचा परमेश्वर निराळा, मुसलमानांचा निराळा, ख्रिश्चनांचा असणारे निराळा आणि आणखी जे धर्म पृथ्वीतलावर असतील त्यांचा परमेश्वर

त्याहूनही निराळा किंवा भिन्न असे कधीच असू शकणार नाहीं. मग तंटे कोण करतात? त्या महान सर्वव्यापी ईश्वराला मानव 'नामे' ठेवतात व त्यावरून आपापसांत स्वतःचाच पंथ, म्हणणे व त्याप्रमाणे धर्म केवळ खरा व इतर खोटे अगर अग्राह्य अशा दृढ भ्रांति मूलक, अज्ञानग्रस्त, परमात्मतत्वाशी विसंगत अशा वल्गना करतात आणि एवढेच करुन थांबत नाहींत तर द्वेषाचे साम्राज्य जगात पसरवितात. त्यापायी अनन्वित छळाची आसुरी कृत्ये करण्यांत त्यांना धन्यता वाटते, धर्माचा अर्थ अनर्थावह करण्यांत ते पटाईत असतात. आणि हे सर्व त्या ईश्वराचे नाव पुढे करून करतात? ही अधोगती की प्रगति?

म्हणूनच सत्य अशा शाश्वत धर्माला उजळा देऊन त्याचे रक्षण व्हावे म्हणून परमेश्वर भूतलावर साकार अवतीर्ण होत असतो परमेश्वर श्रीसाईनाथांच्या रूपाने ह्या भरतभूमीत प्रगट झाला आणि शाश्वत धर्माच्या मूलभूत तत्त्वांप्रमाणे मनुष्याने कसे वागावे हे जगास दर्शविले.

श्रीसाईबाबांचा धर्म कोणता? उत्तर देता येणार नाहीं 'आचारप्रभवो धर्मः धर्मस्य प्रभु: अच्युत:' अशी वेदव्यासांची वाणी आहे याचा अर्थ धर्म हा आचाराने प्रभावित होतो व धर्माचा मालक अच्युत म्हणजे कधीही च्युत न होणारा असा परमेश्वर आहे. 'अल्ला मालिक' ही साईबाबांची वाणी आहे. शब्दांच्या प्रयोगाने ईश्वरसत्तेत फरक पडत नाहीं सर्वांचा मालक, प्रभू, एकच ईश्वर आहे असे जाणणे हा शाश्वत धर्म, ज्याने त्याने आपापल्या धर्माप्रमाणे शब्द यथार्थ ज्ञानाने वापरावेत त्यासाठी मारामारी करण्याचे कारण नाहीं. ईश्वर परमात्मा अपरिमेय आहे त्याला कोणतेही 'प्रमेय' लागू पडत नाहीं साईबाबांचे गाव कोणते? नातेवाईक कोण? त्यांची मातृभाषा कोणती? त्यांचा धर्म मूर्तिभंजक की मूर्तीपूजक? त्यांनी भक्तांना कुलदैवते सोडून किंवा त्यांचा त्याग करण्यास कधी सांगितले काय? बाबांनी कोणत्याही धर्माची अवहेलना निंदा, तिरस्कार केला काय? त्यांच्या करुणेला कधी अंत आहे काय? 'त्यांचे' 'चरित' जाणून घेण्याची योग्य पात्रता तरी आमच्या ठिकाणी आहे किंवा नाहीं याचीच शंका येते. ऐकच तात्पर्य मात्र काढता येते ते म्हणजे श्रीसाईनाथांनी त्यांचे दर्शन घेणाऱ्यांना दिलेले अनुभव हेच त्या प्रश्नांना उत्तर.

परमात्मतत्वात धर्माचे बंड नाही शाश्वत धर्म एकच आहे आणि तो सर्व मानवांना लागू आहे सर्वांच्या अंतर्यामी असणारा ईश्वर एकच आहे, ह्या समभावात शाश्वतधर्म नांदतो शाश्वत धर्मास येणारी काजळी काढून टाकून त्याचा

प्रकाश पूर्ववत करण्याकरिता परमात्मा स्वत: अवतार घेतो हे अबाधित सत्य आहे ते कोणाच्याही मतावर अवलंबून नाहीं.

अनेक प्रवाहातून पाणी वाहते पण पाणी हे मेघातूनच पडते; की जे सर्व प्राणीमात्रांना भेद न करता जीवन देते' 'गायीची तृषा हरू । व्याघ्रास विष होऊन मारू । असा भाव त्या शुद्धजलामध्ये नसतो शाश्वत धर्म ह्या शुद्ध जलासारखा आहे व तो संतांच्या आचारात निर्विवाद असतो हे शुद्ध जल गढूळ व घाणेरडे करणाऱ्या लोकांपासून खऱ्या ईश्वरभक्ताने सावध राहणेच श्रेयस्कर परमभाग्याने श्रीसाईसच्चरित उपलब्ध आहे. त्यापासून शाश्वतधर्माची ओळख होईल. श्रीसाईलीला शाश्वत धर्मच दर्शविते.

ॐ तत सत

★

## नांदा सौख्य भरे

श्री. क. हि. काकरेसाहेब कोर्ट रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान शिरडी यांचे द्वितीय चिरंजीव श्री. किरण (बी. आर्किटेक्ट) यांचा शुभविवाह औरंगाबाद येथील श्री. नेमीचंदजी मेहेर यांची कन्या चि. सौ. कां. ज्योती इजबरोबर ६ फेब्रुवारी १९८४ रोजी सायं. ६ वा. नेहरू भवन औरंगाबाद येथे मोठ्या थाटाने पार पडला. स्वागत समारंभ ७ फेब्रु. ८४ रोजी ११ ते २ या वेळात मंगलकार्यालय शिरडी येथे पार पडला. विवाहस्थळ व स्वागतसमारंभ स्थळ या दोन्ही ठिकाणी वधूवरांना शुभाषिश प्रदान करण्यासाठी विविध क्षेत्रातली मान्यवर व नामवंत मंडळी हजर होती. नूतन विवाहितांचे-अभिष्टचिंतन.

# अगा हे असेचि घडले-साई मूर्तीरुपी आले !

–श्री. प्रल्हाद बि. हुल्याळकर.
मास्टरजी फुटबॉल ग्राउंड, कलंगुट, गोवा.

० कै. बिंदूराव माझे वडील आणि माझे आजोबा रावबहादूर कै. माधवराव (वडिलांचे चुलते) या दोघांनी श्रीसाईबाबा हयात असतांना ५–६ वेळा त्यांचे दर्शन घेतले. माझ्या आजोबांना देण्यासाठी बाबांनी दोन रुपये, पेढे, एक नारळ माझ्या वडिलांकडे दिले. त्यांनी माझ्या वडिलांकडून ९ रुपये मागून घेतले. माझे आजोबा त्यावेळी नाशिकला डेप्युटी कलेक्टर होते. माझ्या आजोबांनी श्री. बाबांचा फोटो आणून पूजा सुरू केली. ज्यावेळी माझ्या आजोबांनी बाबांचा फोटो आपल्या गावी जमखंडीस आणला – त्यावेळी त्यांच्या वडील मंडळींना ही गोष्ट रूचली नाहीं कारण कुटुंब कट्टर वैष्णव पंथाचे. सोवळे–ओवळे कडक. नकळत वातावरण जरा तापले – बाबा हिंदू की मुसलमान वगैरे. कुणास दुखवू नये म्हणून माझ्या आजोबांनी बाबांचा फोटो पेटीत ठेवून टाकला. माझ्या वडिलांनी त्यांचे अनुकरण केले. दोघांनी बाबांची मानस पूजा सुरू केली. त्यावेळेपासून म्हणजे १९१२ पासून जीवंत असेतोपर्यंत ही मानसपूजा चालू होती. मी आजोबांचा लाडका असल्याने, मला ते अधून मधून बाबांबद्दल सांगत. माझ्या आजोबांनी भोर, रामदुर्ग येथे दिवाणपद सांभाळले व पुढे जमखंडी येथे दिवाणपद २ वर्षें सांभाळले. नंतर त्यांनी घरात राहूनच पुष्कळांना मार्गदर्शन केले. उ. माजी उपराष्ट्रपती श्री. बी. डी. जत्ती हे आमच्या घरी वारंवार येत. माझे वडील आणि श्री. जत्ती यांचा अध्यात्मिक स्नेह होता. अधून मधून निंबाळचे प्रसिद्ध तत्त्ववेत्ते व अलाहाबाद विद्यापीठाचे उपकुलगुरु गुरुदेव रानडे पण आमच्याकडे येत असत. माझे वडील आणि गुरुदेव रानडे यांनी एकाचवेळी श्री. उमदीकर महाराज यांच्याकडून गुरुउपदेश घेतला होता. आजोबा हयात असेपर्यंत कुटुंबाची आर्थिक स्थिती उत्तम होती. त्यांच्या निधनानंतर कुटुंब कलह सुरू होऊन स्थिती बिघडत चालली. मी पदवीधर होऊन मुंबई लॉ कॉलेजमध्ये प्रवेश घेतला. मी लॉ कॉलेजमधून डिग्री घेण्यापूर्वीच माझे आजोबा वारले. मी तशा अवस्थेत घरी परत आलो. मन लागत नव्हते. वर्षभर मी तसेच दिवस काढले. नंतर मी गाव सोडण्याचे ठरविले. सगळ्यात लवकर मिळणारी नोकरी म्हणजे "मास्तरकी" ती मी मालवणला जाऊन पत्करली. मालवणात दोन वर्षें मी नोकरी केली नंतर मी गोव्यास जाण्याचा

निर्णय घेतला. त्याच वेळी कर्मधर्म संयोगाने मी लग्न केले. मुलगी मालवणची. थोड्या दिवसांनी माझ्या ध्यानी आले की माझी पत्नी सौ. मीना साई उपासक आहे. तिला खुष करण्यासाठी मी पण वरकरणी साईभक्ति करु लागलो. होता-होता श्री साई माउलीची कृपा होऊ लागली. माझ्या पत्नीने "साईबाबा घोड्या-जवळ" असलेला फोटो आणला होता. मी रोज "साई महात्म्य" वाचू लागलो. दिवस जात होते, तरी आनंदात होतो. १९६५ साली मला पहिला मुलगा झाला तो १० महिन्याचा झाला तरी त्याला काहींच बोलता येत नव्हते. तोंडातून अक्षर फुटत नव्हते. योगायोगाने मी इस्टेव्ह ब्रागांझा दुकानदार कलंगुट या माझ्या एका ख्रिश्चन मित्राबरोबर शिर्डीस माझ्या मुलाला १० महिन्याचा असताना एकटाच घेऊन गेलो. मुलगा समाधी जवळ झोपला. आम्ही दुसऱ्या दिवशी शिर्डीचा निरोप घेतला. घरी येताच मुलगा "बाबा–बाबा" म्हणू लागला. हा पहिला चमत्कार! मुलानंतर मला तीन मुली झाल्या. १९७१ मध्ये आम्ही सर्वजण शिर्डीला येऊन समाधि दर्शन घेतले. नंतर बाबांबद्दल ओढ जास्त वाटू लागली. मला जरा कुंडल्या बघण्याचा छंद लहानपणापासून आहे. पुष्कळ लोक मजकडे रोज येतात. मी माझ्या अल्प बुद्धी प्रमाणे त्यांना बाबांच्या प्रेरणेने मार्गदर्शन करतो. १९७७ मार्च मध्ये मला माझ्या वडील बंधु कै. मुरलीधर यांचे पत्र आले की –"आम्ही तुला भेटावयास गोव्यास येऊ इच्छितो – कळवावे" मी त्यांना परत टपाली कळविले "केव्हांही आनंदाने या" पुढे दोन चार दिवसांनी परत पत्र आले की आता येणे होणार नाहीं. १५ दिवसांनी परत पत्र आले की, "आम्ही मे मध्ये येऊ." मे महिना संपत आला. – माझे बंधु आले नाहींत. जून १९७७ तीन तारखेला माझ्याकडे मुंबईचे असि. पो. कमिशनर मंचेकर यांचा मुलगा "अविनाश मंचेकर" हा आला आणि म्हणाला "मी शिरडीस जाणार आहे १०० रुपये मला द्या." मी म्हणालो ५० रुपये देतो, कारण मलाही खर्च आहे. नंतर मी त्याला लगेच म्हणालो "बाबांच्या मनात आले तर फुकटात शिरडीला जाशील" तो निघून गेला. दुसऱ्या दिवशी काही मंडळी टॅक्सीने शिर्डीस निघाली. मला कुणी सांगितले की एका माणसाची जागा आहे – मी लगेच अविनाशला कळवून त्याची रवानगी केली. अविनाश फुकटात शिर्डीला जाऊन आला. येताना त्याने एक लहान पिशवी भरुन उदी, प्रसाद घेऊन आला. गंमतीने माझ्या पत्नीने अविनाशला म्हटले, "अविनाश तू एकटाच शिरडीहून आलास – बाबांना का घेऊन आला नाहींस?" तो पण गंमतीने म्हणाला "बाबा येत आहेत"! तो गेला हसत–हसत. नंतर ९ जून रोजी (१९७७) माझ्या पत्नीला पहाटे स्वप्न दृष्टांत,

(पान ४१ पहा)

# साई माऊली

★★★★★★★★★★

साई माऊली धाव गे अता
तुझा भक्त हा साद घालतो ।।धृ.।।

धावसी अशी ख्याति तुझी
पावसी अशी महती तुझी
याचवेळी का? वेळ लावता ।।१।।

ना विसरलो तुजला कधी
तुजलाच रे स्मरतो आधी
असता असे का न धावता ।।२।।

भाक रे तुला आम्ही घालतो
मूर्ति ती तुझी मनी आणतो
भाव अमुचा का न जाणता ।।३।।

हे माधवा साई केशवा
घे जाणुनी आमुचा धावा
ये रे ये साई धाऊनि अता ।।४।।

—श्री शहाणे
लक्ष्मी निवास, गडकरी रोड,
डोंबिवली पूर्व.

# शिरडी पति

आले आले वाजत गाजत आले
संत आले महंत आले महाराज आले ॥१॥

कोणी कोणी पाहिले
काय विचारता राव अहो म्हाळसापतीने पाहिले ॥२॥

माणसाचे नाव ठेवतात म्हणे बाराव्या दिवशी मुहूर्तावर
तर या संताचे नाव ठेविले शनीच्या पारावर ॥३॥

पाळण्यात ठेवण्याजोगा होता कुठे
अंगात कफनी डोईला फडके ॥४॥

कसा होता केवढा होता सांगतोच आता
वय असेल सोळा दिसायला भोळा
अंगाने सावळा पण अंगी नाना कळा ॥५॥

येतो काय गावात, करतो काय गमती
नि कस सांगू किती सांगू बोलता
बोलता झाला की शिरडी पति ॥६॥

—राहुल अ. खानविलकर.
लोनावळा

# श्रीसाई स्तवन

(चाल : आनंद कंद ऐसा)

श्री साईनाथ माझे ऽ गुरू, माय, बाप साचे ॥धृ.॥

अंगात एक कफनी । डोक्यावरी रूमाल ।
हातीं असे कटोरा । ऐसेचि रूप यांचे ॥१॥

रोगी तसेच दीन । शहाणे अडाणी हीन ।
शिरडींत सर्व झाले । वाटेकरी सुखाचे ॥२॥

धुनीही पेटवून । उदी होई रामबाण ।
करी दुःख नष्ट मोठे । साऱ्याच आपदांचे ॥३॥

किती एक तारियेले । किती एक उद्धरीले ।
शिरडीत ज्यांनी केले । कल्याण या जगाचे ॥४॥

ना तेल देती वाणी । पंतींत घाली पाणी ।
उजळूनियांच ज्योती । करी दान अंजनांचे ॥५॥

घेऊनियांच भिक्षा । देताति ज्ञान दीक्षा ॥
झोळीत गुप्त ऐसे । कोठार हें धनाचे ॥६॥

साईस नित्य ध्याऊं । लीला कितीही गाऊं ।
तरी बोल बोबडेच । ठरतीच बालकाचे ॥७॥

भवसागरी बुडोनी । जरि राहिलो अडाणी ।
अर्पिन साईनाथां । हे काव्य पुष्प माझें ॥८॥

श्री साईनाथ माझे । गुरू, माय, बाप साचे ॥धृ.॥

—श्री. रा. वि. गाडगोळ
विलेपारले (पूर्व)

# साई तू भक्तोंका आधार

सद्गुरू मेरे साईनाथ तू भक्तोंका आधार रे
तेरी शरणमें आकर मैनें पाया शान्ति धाम रे ॥धृ.॥
तू मंगलकारी जय त्रिपुरारी दत्तात्रय अवतार रे,
तू सुखकर्ता तू दुःखहर्ता हरदम मेरे साथ रे
ओ मेरे बाबा! मनके वासी कर दे बेडा पार रे ॥२॥ सद्गुरु
उदी तेरी संजीवनी हैं देती जीवन दान रे
क्यूं घबराउं दुनियासे जब साई तू शक्तीमान है ॥३॥ सद्गुरु
नमन करू तव ध्यान धरू "साई साई" दिनरात रे,
जनम जनम की प्यासी "चंदु" को चरणोंमें विश्राम रे ॥४॥ सद्गुरु

—सौ. चंद्राबेन भाटे
जयंत व्हिला, रफी अहमद किडवाई मार्ग, वडाळा, मुंबई.

# साईनाथा तुजविण आता

साईनाथा तुजविण आता
नाही मजला जगी या माता
नित्य करितसे तुझाच धावा
चरणी तुझिया आश्रय द्यावा
सदैव वाटे शिरडीस जावे
नित्य तुझे ते दर्शन घ्यावे
प्रत्यक्षात जरी न दिसे साई
साई आहे ठायी ठायी
हिंदु यवनही भक्त गणांना
साईचा हा ध्यास लागला
कुणीही यावे, दर्शन घ्यावे
जाती भेद हा नसे साईला
बाबा मजवरी कृपा करावी
मृत्यु समयी शांती मिळावी

—सौ. सरोजिनी मुळ्ये
६. नाथमंदिर कॉलनी, इंदूर.

# श्रीसाईला वाहते पुष्पांजली

असे माझ्या मनी साईंच विषयी आदरांजली
वाहते त्यांच्या समाधीवर मी भक्तिची पुष्पांजली
वेलीवर उमलली सुवासाची सुंदर जाईजुई
नित्य मुखावर माझ्या नाम असे साई साई ॥१॥

दरवळतो सुवासाचा सोनचाफा निशीगंध
दिला त्यांनी सर्वांना "श्रद्धासबुरी" चा बोध
विखुरली चौहीकडे नाजूक सुरंगी बकुळी
धरली त्यांनी भक्तांवर मायेची अपार सावली ॥२॥

फुलली लाल जास्वंदी शुभ्र शेवंती
न ढळे कधी साईच्या मनाची शांती
उगवले तळ्यात कमळ फुलले सूर्यफुल
असे त्यांचे ठायी सदा धैर्याचे मनोबल ॥३॥

पसरला सर्वत्र सुगंधी मधुमालतीचा ताटवा
सर्वांच्या पाठीशी असे साईचा अखंड दुवा
बाबांनी फुलवला चौफेर सद्‌गुणांचा फुलबाग
आळविते मी साईंना भक्तिचा गोड अनुराग ॥४॥

—सौ. वसुंधरा रामराव चोरे
८०३ सी लक्ष्मी भुवन,
डॉ. आंबेडकर रोड,
दादर, मुंबई १४.

# साईमाऊली

तू माय साईबाबा, तू गुरु साईबाबा ।
ब्रम्हांड नायका तू, मी लेकरू तुझे बा ॥१॥

श्रद्धा मनी जराशी ठेवी जरी कुणीही ।
साई तया प्रचिती देई पहा तरीही ॥२॥

साई न मंदिरी हो, साई न देवळाती ।
साई सदा सुखाने मन मंदिरी रहाती ॥३॥

इच्छा पहा मनींची जाणे सदैव साई ।
जणू भूक लेकराची ती ओळखे ग आई ॥४॥

साई सदा स्मरूनी, राही गृहस्थ कोणी ।
माया पळून जाई राहिल साई ध्यानी ॥५॥

ध्यानस्थ साईबाबा, शिर्डीत राहुनिया ।
भक्तार्थ धाव घेती, जाती त्वरे सहाय्या ॥६॥

संदेश साईबाबा, सर्वांस हाच देती ।
ठेवा अखंड चित्ती, श्रद्धा, सबुरी भक्ती ॥७॥

अल्ला भला करेगा । हे ब्रीद वाक्य एक ।
भक्तास देती बाबा, आशीष हा सुरेख ॥८॥

अवतार कार्य केले, भक्तास सुखविले ।
ह्या साई माऊलीने ब्रम्हांड ज्ञान दिले ॥९॥

—श्री. मधुकर अंबाडे.
अंबाडे हाऊस, दांडिया बाजार, बडोदा.

# साई नमस्कार

असो तुला साई देवा माझा नमस्कार ।।धृ.।।
तुझ्या कृपा दातृत्वाला अंत नाही पार
असो तुला साईदेवा माझा नमस्कार ।।१।।

तुझ्या कृपेने रे होतील फुले फत्तराची
तुझ्या कृपेने होतील मोती मृत्तिकेची
तुझ्या कृपेने रे होतील सर्प रम्य हार
असो तुला साईदेवा नमस्कार ।।२।।

तुझ्या कृपेने होईल उषा त्या निशेची
तुझ्या कृपेने होईल सुधा त्या विषांची
तुझ्या कृपेने होईल पंगू सिंधू पार
असो तुला साईदेवा नमस्कार ।।३।।

तुझ्या कृपा सिंधू मधला बिंदु जरी मिळेल
तरी प्रभो शत जन्माची मन तृषा शमेल
तुझे म्हणूनि आले साई पुसत पुसत द्वार
असो तुला साई देवा माझा नमस्कार ।।४।।

—श्रीमती लिलावती गुजराथी, शिर्डी

## ।। साई–स्मृति ।।

प्रातःकाळी पहाटवेळी मन उल्हसित होते ।
साई–स्मृतिने मन माझे ते मोहरून जाते ।।१।।

उषःकाली तुझ्या राऊळी काकड आरती होते ।
"उठा उठा श्रीसाई" म्हणूनी भक्तगण जागे करते ।।२।।

अरुणोदय समयी स्नान तुझे ते मोहित मम करते ।
सुचिर्भूत तव रूप पाहूनी धन्य धन्य होते ।।३।।
रवि माध्याचा पाहुनी तुझी माध्यान आरती होते ।
तुझे दिव्य, भव्य तेजोवलय मना प्रभावित करते ।।४।।
सायंकाळी कातरवेळी मन दाटूनी येते ।
साई–स्मृतिने मन माझे ते आकळूनी जाते ।।५।।
सूर्यास्ताची सांज आरती भँक्त गणांना जमविते ।
तव नामाच्या जयजयकारे मना सदा फुलविते ।।६।।
शेजारती करण्यासाठी जड मनाने मी जाते ।
परतताना परि पाऊल जड होऊनी घुटमळते ।।७।।

–सौ. भावना दामोदर जेजुरकर
१०, साईधाम, नाना शंकरशेठ पथ, गोपी टॉकीज
समोर, विष्णू नगर, डोंबिवली (पश्चिम).

# मुखी सदा साईनाम

चला जाऊ शिर्डी ग्राम ।
मुखी सदा साई नाम ।।धृ.।।
साईची ती समाधी पाहू ।
डोळे भरूनी दर्शन घेऊ ।।१।।
भाऊ अमूचे साई भक्त ।
करीतात उपदेश आम्हा सक्त ।।२।।
शिर्डीसाठी मन वेडे झाले ।
कामा पोटी स्थगित झाले ।।३।।
जाऊ म्हणतो मार्ग मिळेना ।
साईचे ते दर्शन लाभेना ।।४।।
विश्व उज्वल करूनी ठेविले ।
मुखी सदा साई नाम् राहिले ।।५।।

–श्री. मनोहर र. दळवी
ए–२०३ उज्वल नंदादिप, मिथ
चौकी, मार्वे राड, मालाड, मुंबई ६४.

# श्रीसाईनाथाय नमः

अगाध शक्ति अघटित लीला तुझी साईनाथा
पंचप्राणे ओवाळितो आरति मी तुजला ॥धृ.॥

दर्शन घेता सामान्य दिसशी तू रे अज्ञांना
क्षणांत घेशी ठाव मनाचा तू रे भक्तांच्या
ओळखशी तू क्षणात देवा भक्तांच्या भावना
प्रचिती हा मग देशी त्यांना दावूनि तुझी किमया ॥१॥

वेष तुझा रे किती हा साधा देवा साईनाथा
फाटकी कफनी अनवाणी तू डोईला फडका
धूप दीप नैवेद्य आरति सुमनांच्या माळा
साक्षात् विष्णू असशी तू देवा थाट तुझा आगळा ॥२॥

भिक्षा मागुनि पांच घरी तू पोट भरीशी देवा
बायजा बाईच्या भाजी भाकरीवरी तुझा असे प्रेमा
दाविशी देवा फकिरी पेशा तू जन सामान्या
कुबेरासहि लाजवशी कधी असा तुझा महिमा ॥३॥

दोरी बांधुनि पायाला जणू खेचिशी तू भक्ता
शोधूनि आणिशी भल्या भल्यांना तू रे दुरदूरच्या
चुकलेल्यांना मार्ग दावशी निःसिम भक्तीचा
नास्तिकही मग ठाव शोधिती चरणातळी तुझ्या ॥४॥

नाना परीनी पटविशी तूं तुझ्या भक्तांना
कधी रागवूनि कधी चुचकारूनी अकनि कधी अबोला
दाविशी देवा चमत्कार कधी सोडविशी समस्या
भक्तांच्या कधी मनःकामना पूर्ण करीशी देवा ॥५॥

रज, तम सत्त्व गुणांची तुझी असे माया
मायेपोटी उद्भव जिवा अशी तुझी माया

भक्त कैवारासाठी देवा त्रिगुणात्मक झाला ।
निराकारता तुझ्या रूपाने आली आकारा ॥६॥

शरीराने तू रहात असता शिरडीमध्ये देवा
क्षणांत दर्शन कुठेही तू देशी तुझ्या भक्तांना
मात्र पाहिजे निःसिम भक्ति सबुरी अन् श्रद्धा
भाव मनीचा शुद्ध असावा हाक मारीतांना ॥७॥

भाव मनीचा जसा तसा तं अनुभव देशी भक्ता
कधी रघुनंदन कधी विठ्ठल कधी गिरीजा रमणा
देशी खोटयाच्या कपाळी गोटा खऱ्यास तू हिरा
दुष्टांनाही सुष्ट करूनि लाविशी तू पंथा ॥८॥

मशिदीमध्ये बसुनी देवा सांगशी तूं गीता
शंख, चक्र, गदा, पद्म हातांमध्ये तुझ्या
तुळशी-वृंदावन ही दिसे मशिदीत तुझ्या
चालविशी तूं तिथे अग्निची अखंड आराधना ॥९॥

उदी सम तुझ्या औषध दुसरे जगी नसे देवा
सर्वांवरति उत्तम उदी ही इलाज नको दुसरा
मात्र हवी पण सबुरी श्रद्धा अंतरी भक्तांच्या
साक्षात काळही परतुनी जाई उदी तुझी पाहता ॥१०॥

समाधि मंदिरी साक्षात विष्णू असशी तूं देवा
ब्रम्हा मशिदी, ईश्वर दिसशी तूं रे गुरुस्थाना
डोळ्यांचे पारणे फिटतसे रूप तुझे पाहता
तुझ्या दर्शना सम सुख दुसरे जगी नसे देवा ॥११॥

तेजाची परीसीमा साई रूप तुझे देवा
कोटी सूर्याहूनी आगळे तेज तुझे देवा
साक्षात सूर्य असशी तू देवा जगी ह्या ज्ञानाचा
तुझ्या रूपाने जगी पसरला प्रकाश ज्ञानाचा ॥१२॥

वेषावरूनी मुसलमान तू दिसशी रे देवा
पारशापरि अग्निची तू करीशी उपासना
हिंदुत्वाची बहु लक्षणे नसशी परी सोवळा
जाती–धर्म आणि जन्म मृत्युच्या पलिकडचा तू खरा ॥१३॥

साक्षात देवा दत्त तू असशी ओळखी मी तुजला
कल्याणास्तव भक्तांच्या तू अवतार हा घेतला
लावूनि घेई चरणा जवळी मजला तू रे तुझ्या
जन्म मृत्युच्या फेऱ्या मधुनि सोडिव आता मला ॥१४॥

–श्री. विजय नारायण साने
बी–५ तळमजला, संजय अपार्टमेंट,
टाटानगर समोर, व्ही. ए. पूरव मार्ग,
चुनाभट्टी (पूर्व), मुंबई ४०० ०२२

## साई नामाचा गजर गर्जे गोदातीर

साई नामाची गोडी ।
ईश्वरा चरणी व्हावे दृढी ॥
नाम स्मरणी साईचे
माउलीचे दर्शन ॥
चालता, बोलता लिहीता वाचता ।
गर्जना उठे मनोमनी ॥
जर्जर पिडीतीयांना आधारी ।
रखवाल हा माझा हरि ओम् साई ॥
गगनात ना मावेल असा ।
जेष्ठा सर्वथा ईश्वराधमा ॥
गोदा–भिमा, सरस्वती–यमुना गंगा ।
दातृत्वाचा हा प्रवाह अखंड ॥
तिराहूनी वाहे निर्मळ ।
रघुनाथ हा माझा साई ईश्वर ॥

–श्री. राम धनावडे
सुखशांति को. ऑ. हौ. सोसायटी,
कन्नमवार नगर, विक्रोळी (पूर्व),
मुंबई ४०० ०८३.

## श्रीनाथांच्या मुखकमलावर

पहाट झाली फुटे तांबडे, अरुण प्रभा पसरली
श्रीनाथांच्या मुखकमलावर दिव्य प्रभा फाकली ...

जागे झाले नयन भासती
हास्य सुगंधित अधरावरती
अगम्य तरिही भाव मधुरता
उमलूनिया आली ...

भाव पूजेचा गंध दरवळे
मंत्र धुनीतून नित्य परिमळे
प्रसन्नता ती अष्ट दिशातून
उतरूनिया आली ...

जिवा-शिवाचे जडले नाते
भक्ति रूपाचे दिव्य रूप ते
अंतरातल्या देवपणातून
देव प्रभा उतरली ...

–श्री. म. कृ. विचारे.
१५–बी, भक्ति सुधा, वाकोला पाईप लाईन,
दत्त मंदिर रोड, वाकोला, सांताक्रुझ (पूर्व)
मुंबई ४०० ०५५

## साई जेव्हा नाही संगे

साई जेव्हां नाही संगे
दरिद्री मी भाग्यवंत
साई जेव्हां नाही संगे
पातकी मी पुण्यवंत ...

साई जेव्हां नाही संगे
चोरटा मी मान्यवर
साई जेव्हां नाही संगे
अज्ञानी मी विद्याधर ...

साई जेव्हां नाही संगे
कुबेर मी कर्जदार
साई जेव्हां नाही संगे
भिकारी मी भूमीदार . . .

साई जेव्हां नाही संगे
कुरूप मी रूपवंत
साई जेव्हा नाही संगे
दुर्गुणी मी गुणवंत . . .

–श्री. दत्ता कदम
५७८, चव्हाण अपार्टमेंटस, जंगली
महाराज रोड, डेक्कन जिमखाना पुणे ४

## तेच बाबा मंदिरात

तेच बाबा मंदिरात, तेच साई त्या घरी
स्वप्नांती मज दिसोनि, हे असेच अंतरी ।।धृ.।।
उतरतां शिर्डीस कळस मज तो दिसे
आलो मी या द्वारी साईमाऊली वसे
श्रद्धा भाव तो तसाच, तीच भक्ति या ऊरी
स्वप्नांती मज दिसोनि . . . ।।१।।
वास्तव्यता या क्षेत्री चार दिसांची उणी
जाहले मनी मलाच, तेच दिन वर्षातूनी
वेळ मला भक्तिचे, लागले या भूवरी
स्वप्नांती मज दिसोनि . . . ।।२।।
विनवितां बाबांसी, प्रिय दर्शनापायी
नित्य मज ते भासे त्याच द्वारकामाई
जाहलो मी कृतार्थ, अंत हृदयापरी
स्वप्नांती मज दिसोनि . . . ।।३।।
तेच बाबा मंदिरात तेच साई त्या घरी
स्वप्नांती मज दिसोनि हे असेच अंतरी ।।

–श्री. संजय केशव परळकर
नाना निवास, गोखले रोड, साऊथ
दादर, मुंबई ४०००२८

# परीसपदी

बाळ काय कारणे रडावा
आईला ना प्रश्न पडावा ॥

तद्वत् माझ्या मनात चिंता
तर मग धीर मी का सोडावा ॥

चिंतामणी जर कुणा लाभला
उगा कशाला कोण रडावा ॥

सावरणारे हात जर बळकट
तोल कुणाचा का बिघडावा ॥

परमप्रिय जे चरण अखंडित
बाबांचा सहवास घडावा ॥

दिशाहीन रस्ते रात्रीचे
साई चरणांचा ध्रुव निवडला ॥

भवसागर जर तरून जाणे
सारंग शिर्डीचा पकडावा ॥

बाबा साई चरणी क्षणोक्षणी
दंडवत माझा अखंड घडावा ॥

नर देहाचे जर सोने होणे
परीसपदी या देह पडावा ॥

—श्री. बी. जी. चव्हाण
कनकवाडी (गारगोटी) ४१६ २०९.

# आराधना

करूनी तुझी आराधना
साधते ही साधना
आराध्य मूर्ति तू
पावन रे साईनाथा !

रंगूनी जाई चित्त माझे
तुझ्याच रे भजनी
गाऊ किती मी आरती
साई, गोड माना माझी भक्ति!

गंध–पुष्प नाही हाती
श्रद्धा मनीची केवळ साथी
कर जोडते टेकते माथा
समर्था आपुला आशिष द्यावा!

—सौ. वासंती नांदेडकर
महिंद्र अँड महिंद्र लि.
वरळी रोड नं. १३, वरळी, मुंबई ४०० ०१८

# श्रीसाई

साई रूप होऊनि जाऊ
चित्त रूप त्याला वाहू ।।धृ.।।
भक्तांच्या प्रेमासाठी
भक्तांच्या भक्तीसाठी
धावतो हा जगजेठी
श्रद्धारूप सुमने वाहू ।।१।। साई रूप ।।

साई सारे करवितो
साई दुःख निवारितो
साई अंकी खेळवितो
साई माझा अजानुबाहू ।।२।। साई रूप ।।

देहाचे ते देहपण
मनाचे ते मी–तू पण
आत्म्याचे ते आत्मपण
सारे काही सोडूनी देऊ ।।३।। साई रूप ।।

अक्कलकोटी तोची स्वामी
शेगावी गजानन नामी
प्रगटतो भक्ता कामी
ठाई ठाई त्याला पाहू ॥४॥ साई रूप ॥

साई साई साई साई
गर्जा तुम्ही अविरत साई
तीच माझी द्वारका माई
किती तिचे गुण गाऊ ॥५॥ साई रूप ॥

त्याने दिले हेची स्फुरण
केले त्याने हेची कवन
त्यांच्या चरणी माझे नमन
दासानुदास त्याचे होऊ ॥६॥ साई रूप ॥

धाव पाव गा साईनाथा
ठेवितो तुझिया चरणी माथा
घाली पोटी अपराधा, चिंता
दत्त रूप तुजला पाहू ॥७॥ साई रूप ॥

रोम रोम गातो साई
सुभाष ठेवितो माथा पाई
आशिर्वाद देई साई
वाडे कोडे पोवाडे गाऊ ॥८॥ साई रूप ॥

दत्तात्रया, अवधूता, दिगंबरा, साई एकनाथा ।
तुमचे चरणी आता ठेवियला माथा ॥
सारे मनोरथ पुरवा बाबा हीच विनंती परिसावी
मी लेकरू तू मायबाप माझा करा आता कृपेची साऊली ॥

–श्री. सुभाष सदाशिव खारकर
११५ ब, विश्रांतवाडी, पवार चाळ,
पुणे ५११ ०१५

(पान २४ वरून)

झाला. तो – "तिला कोणीतरी मोठ्याने सांगत आहेत, ऊठ,लवकर ऊठ तुझ्या-, नवऱ्याचा भाऊ येत आहे, खूप वर्षांनी येत आहे, दृष्ट काढ, मग आत घे, भावानी एकदम भेटू नये – ती पहाते". बाबा केशरी कफनी घालून हळूहळू घराच्या पायऱ्या चढत आहेत आणि माझी पत्नी भाकऱ्या घेऊन दृष्ट काढत आहे." तिने मला स्वप्न सांगितले. मी तिला म्हटले "मनी वसे ते स्वप्नी दिसे." कदाचित माझा भाऊ अकस्मात येईल. मी जरा मानसशास्त्राचा आधार घेऊन तिची थट्टा केली. २२ जून रोजी आम्ही सर्वजण दुपारी झोपलो होतो. बाहेर जरा पावसाची रिमझिम सुरू होती. साधारण ३/३०–४ चा सुमार असावा त्यावेळी दरवाजावर कुणी थाप मारली म्हणून दार उघडले – तोच घरासमोर दोन अँबेसडर गाड्या उभ्या आणि काही लोक छत्र्या घेऊन उभे आहेत. लगेच "श्री. आबाजी पणशीकर" (ज्यांची आमची ओळख पूर्वी नव्हती). आणि काहीं प्रतिष्ठित माणसे गाडीतून बाहेर आली. मला कसलाच बोध होईना. लगेच श्री. आबाजी पणशीकर माझ्याकडे आले आणि म्हणाले –"मास्तर आम्ही साईबाबांची मूर्ति आणली आहे. आज रात्रौ तुमच्या घरी ठेवा. उदईक सकाळी ती आम्ही देवळात स्थापनेसाठी नेणार आहोत." मी आनंदाने ठेवा म्हणून सांगितले. रात्रौ सर्व मंडळी गेल्यावर माझी मुले एका रांगेत उभी राहून म्हणाली, "बाबा, तुम्ही आमचे खरे बाबा असाल तर तुम्ही इथेच राहणार" मी लगेच मुलांना दटावले "असे बोलू नये, तुम्हांला पाहिजे असेल तर, मी एक मूर्ति विकत आणून देईन, ती देवळासाठी आणलेली मूर्ति आहे" दुसऱ्या दिवशी सकाळी ११ वाजेपर्यंत कोणी आले नाहीं. मग १२ वाजता मंडळी जमू लागली. त्यात पुष्कळ प्रतिष्ठित मंडळी होती. सौ. नयना शाहू चे पती श्री. जयराव (सिने डायरेक्टर किशोर शाहू यांचे जामात) आणि दुसरे त्यांचे स्नेही श्री. लूसिओ मिरांडा आर्किटेक्ट इंजिनिअर पणजी. एक ज्योतिषी कुलकर्णी आणि कलंगुट ग्रामातील भक्त मंडळी. लगेच कोण एक निरोप घेऊन आला की "थोडी अडचण आली आहे". नंतर एक दोघे मूर्ति उचलण्यासाठी पुढे जाऊन मागे सरकले. कोण मूर्ति उचलायला तयार होईना. शेवटी दुपारी १–३० वाजता श्री. आबाजी म्हणाले –"पांचा मुखी परमेश्वर" मूर्ति इथेच ठेवू या. सत्यनारायण पूजा, गणपती पूजा वगैरे विधि होऊन माझ्या राहत्या घरी श्री बाबांची मूर्ति विराजमान झाली. ही घटना २३ जून १९७७ रोजी घडली. तेव्हांपासून रोज रात्रौ ७ वाजता बाबांची आरती चालू आहे. – अजून चालू आहे. तदनंतर माझ्या घरी हजारो देशी–परदेशी माणसे येऊन गेली. – अजूनही येत आहेत. प्रत्येकांना निरनिराळे अनुभव येत आहेत. हे सर्व अनुभव एकत्रित केल्यास एक पुस्तकच होईल. "नित्य मी जीवंत – जाणा हेचि सत्य" याचा अनुभव पदोपदी येत आहे.

88

# शेषाच्या रुपात मला दिसलेले श्रीसाईभगवान

—कु. वत्सला मु. आजगांवकर
रीटायर्ड सुपरवायझर, आयकर ऑफिस,
पुष्पांजली, ब्लॉक बी—२ गोशाळा लेन,
मालाड, मुंबई ४०० ०६४.

बाबांनी नोटीस फिरविली

० मला इमरजन्सीमध्ये कम्पलसरी रिटायर्डमेंटची नोटीस मिळाली. ती नोटीस ज्या दिवशी सही करण्यासाठी माझ्याकडे आली, त्याच्या अगोदर दोन दिवस आधी "श्री बाबा" माझ्या स्वप्नात आले व माझ्या पोटावर त्यांनी एक दगड मारला त्या दगडाचा अर्धा नारळाचा भाग होऊन खाली पडला.

त्याचवेळी घरी माझ्या नित्यपूजेमधली श्री बाबांची तसबीर, जी दरसाल एक साईसप्ताह करून घ्यायची. त्या तसबिरीमध्ये बाबांच्या चेहेऱ्याजवळ पाच पिवळ्या फणा असलेल्या शेषाचं रूप श्री बाबांनी धारण केल व बाबांच्या पायाजवळ एक लहानसा काळ्या रंगाचा (नाग) सर्प लहानशी फणा उभारून राहिला होता, व त्याच्या शेपटीवर श्री. बाबांनी उजवा पाय ठेवल्यामुळे तो पुढे जाऊ शकत नव्हता. अशारितीने माझ्यावरचं संकट काळ्या सापाच्या रुपाने आल होतं व श्री. साईबाबांनी शेषांचं रूप धारण करून त्याला नाहिसं केलं होतं.

मला का नोटीस दिली हे कोणालाच सांगता आलं नसतं. मी अत्यंत प्रामाणिकपणे नोकरी करीत होते व माझे सर्व गोपनीय रिपोर्ट चांगले होते. फक्त प्रकृतीची थोडीशी तक्रार होती इतकंच. नोटीस मिळाली तरी श्री. बाबा माझ्याबाजूला आहेत हे स्वप्नावरून व बाबांच्या तसबिरीवरून मला सूचीत झाल होतं. त्या भरंवशावर मी, इतर मोठमोठ्या अधिकारी वर्गाने "रीप्रेझेन्टेशन करू नका. ही इमरजन्सी आहे, काही उपयोग होणार नाही" असं सांगितलं असताही मी सर्व काही "बाबांच्या" भरंवशावर सोपवून प्रयत्न करायचा ठरवला. प्रयत्न करायला सुरवात केल्यावर मला काहीं चांगले अधिकारी भेटले व त्यांनी माझा अगदी चांगला रिपोर्ट लिहिला, की जो मला पुढे उपयोगी पडला. त्या सर्व रीपोर्टसहित रीप्रेझेन्टेशन केले व त्याची एक एक कॉपी घेऊन सरळ दिल्ली

अगदी एकटीने प्रवास करून गाठली. तिथे माझी एक मैत्रीण मिसेस वृन्दा सेन म्हणून आहे. तिच्या नावाचा मुद्दाम उल्लेख करावासा वाटतो कारण तिचा मला दिल्ली स्टेशनवर गेल्यापासून तो परत मुंबईला येईपर्यंत फारच उपयोग झाला. ती मला न्यायला स्टेशनवर आपली गाडी घेऊन आपल्या पतिसहित आली होती. दिल्लीत मी प्रथमच गेल्यामुळे अगदी भांबावून गेले होते, दिल्लीतला माझा मुक्काम तिच्या घरीच होता व जिथे जिथे माझ काम असायचं तिथे तिथे माझ्याबरोबर तीच असायची व मार्गदर्शन करायची. ही साईमाऊलीचीच कृपा दुसरं काय?

बरं, पुढे पहा कशी गंमत "बाबांनी" केली ती! तिथल्या त्यावेळच्या कम्पलसरी रीटायर्डमेंट कमीशनचे चेअरमन की ज्यांना भेटणं जरूर होतं. ते श्री. गणपती पूर्वी मुंबईला इन्कमटॅक्स कमिशनर होते तेच मला पहाताक्षणी आपणहून म्हणाले, "मी हिला ओळखतो, हिला कम्पलसरी रीटायर्डमेंटची नोटीस का मिळाली? मी पहातो पुढचं सर्व काहीं" असं म्हणून त्यांनी माझे सर्व गोपनीय रिपोर्ट व रीप्रेझेन्टेशन मुंबईहून मागवून घेतले व त्यांची पूर्ण चर्चा करून मला सर्व मागच्या हक्कांसहित परत घेतलं. श्री. गणपतींनी मला पहाताक्षणी मी हिला चांगली ओळखतो म्हणावं, तिथे नक्कीच साई सूत्रधार नाहीतर चेअरमनने एका क्षुल्लक हेडक्लार्कला ओळख दाखवावी व पुढचं काम करावं हे नवलच. चेअरमन ओळखीचे असावे हे पण नवल, तेव्हा श्री साई तारणार त्याला कोण मारणार? भारतामध्ये कम्पलसरी नोटीस मिळून परत घेतलेल्यामध्ये मला वाटतं मी एकटीच आहे. नंतर दोन वर्षांनी मला सुपरवायझरचं प्रमोशनही मिळालं.

आता साईबाबांनी पोटावर मारलेल्या दगडाचा अर्धा नारळ झाला व खाली पडला, याचा अर्थ माझ्या अल्पबुद्धिप्रमाणे मी लिहिते तो असा :—

मी (नियमाप्रमाणे) वयाप्रमाणे जेव्हां रिटायर्ड झाले त्याच्या आधी एक वर्ष. असा कायदा पास होऊन दिल्लीहून आला की "सेवानिवृत्त लोकांना अर्ध वेतन मिळावं." त्याप्रमाणं मला निवृत्त झाल्यावर अर्धी पेन्शन मिळायला लागली.

अशारितीने ही साईमाऊली भक्तांसाठी भूत, भविष्य आणि वर्तमानकाळ सुचविते व संकट असल्यास त्याचे निवारणही तीच करते म्हणून एकच साई भजावा जेणेकरून त्यांच्या चरणाजवळ मन निर्विषय होईल व परमेश्वरी सत् तेजाला साईभक्तांना साईस्वरूपात दर्शन देणं भाग पडेल.

# आमचे श्रीसाई

—श्री. सुरेश ह. कोपरकर.
कोपरकर हाऊस, भांडुप, मुंबई ७८.

"आमचे साई!" खरोखरच आमचे साई ह्या शब्दात किती आत्मियता आहे. ह्या आत्मियता मधूनच आमचे साई हे शब्द मुखातून प्रगटतात.

मी लहान असताना प्रथम वडिलांच्या बरोबर शिरडी येथे जाऊन आलो तेव्हां ते जे पहिले दर्शन बाबांचे झाले ते मनात ठासून राहिले नंतर जेव्हां मी जाणकार झालो तेव्हां कधी घरातील व्यक्तिबरोबर, कधी मित्रांबरोबर शिरडी येथे साईच्या आशिर्वादानेच जाणे होत असे.

साईच्या वचना प्रमाणे माझ्याकडे जो जे मागेल ते त्यास मी देईन ह्या प्रमाणे आमच्या कोपरकर इस्टेटमध्ये अशक्यप्राय न होणारी गोष्ट माझ्या 'साईने' करुन दाखविली व आम्हांला आमच्या इस्टेटमध्ये "एनोसी" मिळवून दिली. फक्त साईची प्रार्थना केली की साईबाबा जर आजपर्यंत आम्ही कोणाचे वाईट केलेले नसेल, वाईट चिंतले नसेल व तुझ्यावर खरी भक्ती असेल तर आमचे काम आपण करवून द्यावे. त्या प्रमाणे माझ्या साईने काम केले हा माझ्या जीवनातील एक अनुभव व दुसरा अनुभव आमचा लहान छोकरा बंटी याची एक दिवशी अचानक प्रकृती बिघडली, डॉक्टरकडे घेवून गेलो डॉक्टरांनी सांगितले की हॉस्पिटल मध्ये ॲडमिट करावे लागेल त्याप्रमाणे ॲडमिट केले. इकडे आमच्या जीवात जीव नव्हता मी सारखा साईंना मनातल्या मनात आळवित होतो. आमच्या बंटीला सुखरुप ठेवा, सुखरुप ठेवा रात्री घरी आलो साईबाबांच्या तस्बीरी समोर उभा राहून त्यांची बिभूती घेतली व सांगितले साई आमच्या मुलाला ही तुमची बिभूती लावतो व तुमच्या दर्शनाकरिता त्यास घेवून येईन अशी मनापासून प्रार्थना केली व रात्री ११ वाजता हॉस्पिटलमध्ये जाऊन बिभूती मस्तकाला लावूनआलो. त्यानंतर दुसऱ्या दिवसापासून आमच्या बंटीला बरे वाटू लागले तेव्हां साईंना सांगितले साई तुम्हीच आमचे मायबाप आहात आपल्या लेकरावर कृपादृष्टी ठेवा त्यानंतर आजपर्यंत आमचा बंटी चांगल्या प्रकारे खेळत असतो. आता हा लेख लिहित असतांना परत प्रकृतीस बिघाड झाला व कदाचित मी लेख लिहित नाहीं

म्हणून साई रागावले असतील. तेव्हां साई आमच्यावर रागावू नये. हा संपूर्ण लेख लिहिल्यावर आमच्या बंटीला आराम पडेल हा माझा दुसरा अनुभव. साई चरणी आम्ही सर्व मस्तक टेकवितो व प्रार्थना करतो आपण आम्हां सर्वांना सुख-रूप ठेवा व आनंदीत राहू द्या.

जय साईबाबा

# कपडे मिळाले

—सौ. उमा मुरारी वाळिंबे.
कृतार्थ सोसायटी,
३।४ पुणे सातारा रोड,
पुणे ३७.

० माझ्या माहेरी श्री. साईबाबांची उपासना मला आठवते ते अगदी माझ्या लहानपणापासून करीत आहे. माझे वडिल साईबाबांचे भक्त होते. माझी स्वतःची साईबाबांवर अतिशय श्रद्धा आहे. कोणत्याही प्रसंगी सतत ते पाठीशी आहेत असा माझा दृढ विश्वास आहे. मला त्याबाबत अनेकदा अनुभव आले आहे. आमचे घर पुणे सातारा रस्त्यावर व पुण्यातील साईबाबांचे प्रसिद्ध मंदीर स्वारगेट जवळ आहे. आमच्या रोजच्या येण्या-जाण्याच्या रस्त्यावर आहे. मी ऑफिसला कॉट्रॅक्ट बसने रोज जाते-येते. आमची सकाळी बसची वेळ १० वा. ची आहे. ऑफिसला जाताना एखाद्या दिवशी मंदिरात जाऊन साईबाबांचे दर्शन घेणेची अगदी मनापासून अनिवार्य इच्छा होते. त्यावेळी मी मंदीरात गेल्या शिवाय रहात नाही. आणि सांगायची गंमत म्हणजे त्या दिवशी बस नेमकी लेट येते. जवळ

जवळ १० मिनिटे वगैरे. जेव्हां २ मिनिटे अशी देवळात जाऊन नंतर धावत पळत बस गाठण्याचा प्रयत्न करते तेव्हां तेव्हां आतापर्यंत प्रत्येकवेळी बस उशीरा आल्यामुळे माझी कधीच गैरसोय झालेली नाहीं.

एकदा माझ्या पतीचे कपडे लॉन्ड्रीवाल्याकडून गहाळ झाले. दोन–तीन महिने सतत त्याचेकडे विचारणा करत होतो. त्याने सांगितले होते की "तुमचे कपडे चुकून अमक्या तमक्याकडे दिलेत व ते कोल्हापूरला गेलेत, २।३ महिने येणार नाहींत. त्यामुळे मी कपडे परत मिळतील अशी आशा सोडून दिली होतो. एकदा साईबाबांचे मंदिरात गेले असता मी सहज बाबांना म्हणाले की "ह्यांचे कपडे परत मिळू दे मी लगेच अभिषेक करेन आणि आश्चर्याची गोष्ट अशी की त्यानंतरच्या गुरुवारी संध्याकाळी तिन्हीसांजेच्या वेळी लॉन्ड्रीवाला स्वतः ह्यांचे कपडे घरी घेऊन आला. हात आपोआप साईबाबांना जोडले. एकदा माझ्या मुलाच्या आजारपणातही मी सर्व भार साईबाबांवर ठेवून होते. साईबाबांचे मनापासून स्मरण करून त्यांना सांगितले की "माझे हाकेस धावून या मी समाधीला व आपल्या मूर्तीला कपडे करेन आणि आम्ही शिरडीला येवू. मला खात्री होती की ते आपल्या भक्तावर कधी अवकृपा करणार नाहींत. त्याचे प्रत्यंतर मला लगेच आले.

"तुम्ही माझेकडे लक्ष द्या मी तुमचेकडे पाहीन" या बाबांच्या उक्तीचा मला सतत अनुभव आलेला आहे व त्यामुळे त्यांचे वरील श्रद्धा अधिकाधिक दृढच झालेली आहे

---

## कुलकर्णी–उदगावकर शुभविवाह.

साईलीला मासिकाचे लेखक–कवी व पुण्याचे प्रख्यात छायाचित्रकार श्री. जगन्नाथ नारायण कुलकर्णी यांची जेष्ठकन्या चि. सौ. कां. शुभदा इचा विवाह पुण्याचे श्री. विद्याधर रामचंद्र उदगावकर यांचे चिरंजीव श्री. विश्वासराव, इंजिनियर, यांचे बरोबर २८–२–८४ रोजी पुणे येथे थाटात साजरा झाला. वधूवरांना शुभाशिष देण्यास विविध व्यवसायातील मंडळी बहुसंख्येने हजर होती. वधुवरांना आमचेही शुभाशिष.

# श्रीसाईबाबा मी चुकले

********************

—सौ. दमयंती जयाजीराव कदम.
ए।३ कमलवन को. हा. सोसायटी,
कांदिवली (पश्चिम), मुंबई ४०० ०६७.

० गेल्यावर्षी माझ्या घरातील तांब्याचे अर्धा शेराचे माप हरवले होते ते मी एक जुन्या तांदळाच्या डब्यात टाकून ठेवलेले होते व मी ते पूर्ण विसरुन गेले होते. एकदा सफाई करतांना तो डबा मी काढला पण त्याचे झाकण उघडत नव्हते व तो डबा मला धुवावयाचा होता. तेव्हा आमच्या माळ्याला मी तो डबा उघडायला सांगितला. त्याने डबा उघडून ते माप तो घेवून गेला. आमच्या मोलकरणीने तो डबा धुतला. दुसरे दिवशी मला त्या मापाची आठवण झाली. पण ते माप मोलकरणीने घेतले की माळ्याने घेतले ते मला समजत नव्हते. मी दोघांना विचारले तर दोघांनी एकमेकाची नावे सांगितली. मी बाबांना सांगितले की माझे माप मिळू दे की माझा अनुभव लिहून पाठविन. त्याप्रमाणे गुरुवारी माळी आला व म्हणाला तुमचे माप तिकडे झाडाच्या खाली टाकलेले आहे. मी जाऊन पाहिले तर औदुंबराच्या झाडाच्या बुंध्यात ते माप पडलेले होते. गुरुवारी औदुंबराच्या झाडाच्या बुंध्यात ते माप मिळावे ही श्रीसाईबाबांची कृपा नव्हे काय?

## वस्तूपण मिळाल्या.

माझा दुसरा अनुभव म्हणजे माझ्या मोलकरणीने एक नवी ओली चादर व एक स्टीलचा नवा मोठा पेला काम करता करता घेऊन पळाली. माझ्या घरी बाहेर गावाहुन आलेले पाहुणे मंडळी त्यांच्या गावी जाण्याच्या तयारीत होते. त्यावेळी माझ्या लक्षात आले नाहीं. ती मंडळी निघून गेल्यानंतर लगेच माझ्या लक्षात आले मी मनोभावे श्री साईबाबांची उदी घेऊन म्हटले बाबा माझ्या दोन्ही वस्तु मिळू दे मी अनुभव लिहून पाठवीन. दुसऱ्या दिवशी माझ्या मोलकरणीने ती ओली चादर व तो स्टीलचा पेला घेऊन स्वतः आली ती म्हणत होती या दोन्ही वस्तू मी घेऊन फिरत होती, ही श्री साईबाबांची कृपा होय.

# भक्तिचा अनुभव

—कु. सुजाता मुळे
नाथ मंदिर कॉलनी, इंदूर.

० माझी आजी, आत्या वगैरे सर्वच आमच्या घरात श्री साईबाबांचे भक्त आहेत. माझ्या आजीचे वडील कै. वा. काकासो महाजनी हे पण श्री बाबांचे परमभक्त होते. आमच्या घरात श्री साईबाबांच्या भक्तिचा वारसा आहे असेच म्हटले पाहिजे.

एकदा माझी आजी आजारी असतांना मध्यरात्री श्रीसाईबाबा तिचे पाय चेपीत बसलेले तिच्याजवळ बसलेल्या आमच्या मोलकरणीला दिसले. इतके त्यांचे आमच्या घरावर संरक्षण आहे.

मला आजीने श्री बाबांचे चमत्कार सांगितले. श्री साईलीलेतूनही मी चमत्कार वाचते ते वाचून वाचून श्री बाबांच्याबद्दल माझ्या मनांत खूपच भक्ती उत्पन्न झाली आहे. व शिर्डीला जाऊन त्यांचे दर्शन घेण्याची अत्यंत ओढ लागली आहे व ती श्रीसाईबाबा माझी इच्छा पूर्ण करतीलच ह्यावर माझी पूर्ण श्रद्धा आहे. व मी धीर धरून आहे.

माझी आत्या शिरडीला गेली असताना तिने मला श्री साईबाबांचे मध्ये गोल लॉकेट असलेली एक चेन आणून दिली. ती मी रोज गळ्यात घालते. मध्यंतरी दोन चार दिवस ती गळ्यांत न घालता मी काढून ठेवली होती व विसरून गेले. पण मग आठवण आल्याबरोबर मी ती चेन लगेच गळ्यात घातली. तर काय आश्चर्य! चेन काळपट झाली होती ती गळ्यात घातल्याबरोबर खूप चमकू लागली व लॉकेटही चमकले. तीच चेन घालून मी रात्री टेबलावर बसून अभ्यास टेबल लॅम्पखाली करीत असताना माझ्यासमोर टेबलावर वही ठेवली होती. त्यावर इतका छान गोलाकार प्रकाश पडला व त्या गोलात मला श्रीसाईबाबा दिसले. अशा तऱ्हेने श्री बाबांनी माझ्या मनांतील भाव ओळखून मला दर्शन दिले म्हणून मला खूप आनंद झाला. "जया मनी जैसा भाव, तया तैसा अनुभव" हे त्यांनी सिद्ध करुन दाखविले.

माझ्याजवळ श्री बाबांचा फोटो आहे. त्याला मी रोज सकाळी उठल्याबरोबर व रात्री झोपतांना नमस्कार करते. त्यांची उदी कपाळाला लावते व थोडी खातेही परीक्षेला जाताना मी श्री साईबाबांच्या फोटोला नमस्कार करुन जाते. त्यामुळे मला गुणही छान मिळतात अशी माझी त्यांच्याबद्दल निष्ठा आहे. अशीच श्री साईबाबांची कृपा मजवर अखंड राहो हीच माझी त्यांना भावपूर्वक विनंती आहे.

माझे वय बारा वर्षाचे आहे. मी सातवीत शिकत आहे.

---

**२१ सावे अखिल भारतीय साईभक्तांचे अधिवेशन मार्च ८४ मध्ये कलकत्ता येथे**

अखिल भारतीय श्रीसाईभक्तांचे २१ सावे अधिवेशन संमेलन यंदा कलकत्ता यथे २० ते २३ मार्च १९८४ असे चार दिवस भरविण्यात येत आहे. हे अधिवेशन श्री शिरडी साईबाबा मंदिर सोसायटी ३९, जतीनदास रोड, कलकत्ता ७०००२९ या संस्थेने दिलेल्या आमंत्रण व पुढाकारावरून तिथे भरविण्यात येत आहे. १९५० साली प. पू. नरसिंह स्वामीजींच्या उपस्थितीत कलकत्ता येथे यापूर्वी चौथे अधिवेशन भरविण्यात आले होते. या संमेलन–अधिवेशन प्रसंगीच ता. २२ मार्च रोजी तेथल्या श्रीसाई मंदिरात श्री बाबांची संगमरवरी मूर्ती वेदमंत्राच्या विधीयुक्त जयघोषात प्रतिष्ठापित करण्याचा महान योगही साधण्यात आला असून उपस्थित भक्तांना या मंगल उत्सवात सहभागी होण्याची सुसंधी लाभणार आहे. या अधिवेशनास हजर रहाणाऱ्या प्रत्येक भक्ताची सभासद वर्गणी अवघी २५ रु. ठेवण्यात आली असून ती वेळ न दवडता लागलीच — सौ. सरोजिनीदेवी राजुलू, संस्थापक–अध्यक्ष श्री. शिर्डी साईबाबा मंदिर सोसायटी, ३९ जतीनदास रोड, कलकत्ता –२९ येथे किंवा अध्यक्ष ऑल इंडिया साई समाज, मैलापूर, मद्रास ६००००४ येथे त्वरेने पाठवावी अशी विनंती अध्यक्ष श्री. टी. केशवराव यांनी केली आहे.

# श्री बाबांमुळे बॅग मिळाली

**********************

—सौ. विनोदिनी मा. राजपूत
२०३, लेक पॅलेस,
मरोल व्हिलेज,
अंधेरी (पूर्व), मुंबई ५९.

० गुरुवार २९ जानेवारी ८३. माझे घरी सुताराचे काम चालू होते. त्याला सनमायका घेऊन देण्यास माझे मिस्टर अंधेरी येथे दुकानांत गेले. ते सनमायका घ्यायला गेले तेव्हां त्यांच्या हातांत ऑफिस बॅग सफारी होती. ती बॅग दुकानांत काऊंटरच्या टेबलावर ठेवली, व हे सनमायका बघत होते. किती ५ मिनिटे! सनमायका निवडला व पाठ करून पाहतात तो बॅग गायब! ते चांगलेच हादरले. बॅगमध्ये ७०००।– रु. कॅश होती. व कॅशपेक्षा महत्त्वाची कागदपत्रे होती. त्यांचे लायसेन्स पण त्याच्यातच होते. माझे मिस्टर इलेक्ट्रीकल कॉन्ट्रॅक्टर आहेत. त्यामुळे लायसेन्स ८४ सालाचे पुन्हा नव्याने करायचे होते. वायरमन मुले ज्या परीक्षेला बसतात त्यांची सर्टिफिकेटस् फोटो सर्व त्यांच्या बॅगमध्ये होते. पोलिसात तक्रार केली. दुपारी २। ला बॅग गेली.

मी त्यावेळेला पार्ला येथे श्री. बांदेकर यांचेकडे गेले होते. तेथून आले. तर संध्याकाळी ७ वा. मिस्टरांचा फोन आला "बॅग चोरीला गेली. सुतार सनमायका घेऊन घरी येत आहे त्याला घरातून पैसे दे." मी पण दुःखी झाले. पैशापेक्षा आम्हाला कागदपत्रे महत्त्वाची. मी बाबांच्या फोटोसमोर खूपच रडले. "आज गुरुवार माझा चांगला दिवस, मग आजच का असे वाईट झाले? मी २, ३ प्रकारे वेगवेगळ्या अर्थाने चिठ्ठ्या बाबांच्यापुढे टाकल्या. व माझ्या मुलाला (छोट्या) उचलायला सांगितल्या. तेव्हां त्यात 'बॅग मिळेल पण पैसे मिळणार नाहीत' असे उत्तर आले. मिस्टर रात्री १ वा. आले. त्यांना म्हटले "आपली बॅग मिळणार बाबा म्हणाले" तरी यांचे समाधान नाही.

शुक्रवार शनिवार असेच नाराजीत गेले. रविवार १ जाने. ८४ सकाळी १० वा. फोन आला "मैं हॉटेल व्हाईट वे से बात करता हूँ। आपके आदमी यहाँ बॅग छोडके चले गये है उनको भेज दो बॅग लेके जानेके लिए पत्ता लिखलो"

मी पत्ता लिहून घेतला फोन ठेवला व आनंदाने बाबांच्या फोटोसमोर नाचायला लागले. व मिस्टरांना पण खूपच आनंद झाला. ते तयार होऊन बॅग घेण्यास गेले. व बॅग घेऊन १।। वा. दुपारी आले. बॅगमधले सर्व पैसे चोरीला गेले होते. पण. कागदपत्रे (जी माझ्या मिस्टरांची महत्त्वाची) मात्र सर्व जशीच्या तशी होती. त्याला स्पर्श पण केलेला नाहीं अशी होती. मुख्य म्हणजे गुरुवारी २९ ता. ८३ लाच चोर ती बॅग घेऊन त्या हॉटेलमध्ये गेला व बॅग सोडून गेला. ती बॅग वेटरने मालकाजवळ दिली. मालकाला वाटले बॅग विसरणारा माणूस घेऊन जाईल. पण त्याला हे माहित नव्हते की ती बॅग चोरीची आहे जेव्हां माझे मिस्टर तेथे गेले. तेव्हां त्या मालकास कळले की ती बॅग चोरीची होती. व सांगायचा मुद्दा हा की ती बॅग घेण्यास गुरुवारी रात्री ८ वाजेपासून रविवार सकाळपर्यंत ४, ५ माणसे आली होती. पण त्या मालकाने ओळख दाखविल्या शिवाय बॅग देणार नाहीं ही अट घातली. त्या मालकाला पण काय बुद्धि द्यावी बाबांनी. कारण त्या बॅगमध्ये साईबाबांचे फोटो तर होतेच पण छोटीशी मूर्ति देखील होती. ती बॅग आणल्याबरोबर आम्ही खूपच खुश झालो.

ताबडतोब तयार होऊन आम्ही ग्रँटरोडला साईधाममध्ये बाबांचे दर्शन केले. तेथे बाबांच्या प्रसादाच्या चादरीचा लिलांव चालला होता २ प्रसादांच्या चादरी आम्ही घेतल्या. व तेथून घरी परतलो. काय बाबांची अगाध लीला! मिस्टरांचे पण डोळे पाण्याने भरून आले.

अशीच बाबांची आम्हां सर्वांवर कृपा असू दे!

त्यांना माझे अनंत प्रणाम!

"श्री सच्चिदानंद सद्गुरु श्री साईनाथ महाराज कि जय!"

# साईबाबा—एक युगपुरुष

—श्री. बिपिन कपीलराय स्वादिया
२०७, कमल कुंज, तिसरा मजला,
दत्त मंदिर रोड, संगीता सिनेमा समोर
मालाड (पूर्व) मुंबई ४०० ०६४.

० संत कबीराने म्हटले आहे की,

गुरु, गोविंद दोनो खडे, किसको लागु पाय ।
बलिहारी गुरुदेवकी जिसने गोविंद दियो बताई ॥

जो गुरु आपल्याला ईश्वराच्याजवळ घेऊन जातो व आपल्याला ईश्वराचे दर्शन करून देतो त्यांच्यामध्ये व गुरु गोविंद यांच्यामध्ये कोणताहि फरक नाहीं. ते दोघेहि सारख्याच योग्यतेचे आहेत. जे खरोखर भाग्यवान आहेत त्यांनाच श्रीसाईबाबांजवळ जाता येते व ज्यांना श्रीबाबांनी आपला आश्रय दिला त्यांच्या सारखी भाग्यवान व्यक्ति तीच!

काशीत जसे विश्वनाथ, पंढरपूरात जसे विठ्ठल, प्रभास पाटणांत जसे सोमनाथ महादेव, द्वारकेत जसे द्वारकाधिश तसेच श्रीसाईबाबा हे शिर्डीत आहेत.

आपल्या संस्कृतीचा पाया म्हणजे त्याग व समर्पण! "त्येन त्यक्तेन भुंजीथा" अर्थात् सर्वस्वाचा त्याग करून जीवन जगण्याची शिकवण दिली आहे. ज्याप्रमाणे अगरबत्ती स्वतःला जाळून इतरांना सुवास देते त्याप्रमाणे आपण आपल्या जीवनाचे ध्येय दुसऱ्यांची सेवा व भले करणे हेच ठेवले पाहिजे. श्री बाबा नेहमीच इतरांची दुःख स्वतःवर घेत. म्हणूनच त्यांनी स्वतःचा जीव देवून तात्या पाटील यांना जीवदान दिले! ज्याप्रमाणे श्रीकृष्णाने दुर्योधनाच्या मतलबी गोष्टींपेक्षा विदुर व अर्जुन यांची निष्काम भक्ति व निष्ठा जास्त पसंत केल्या किंवा जसा गांचा हा स्वभाव आहे की नदी व समुद्र यांच्यातील थोडेसे पाणी घेऊन त्याच्या कितीतरी पट वर्षाव करणे त्याचप्रमाणे श्रीबाबांना आपण जे देतो त्याच्या कितीतरी पट ते आपल्याला देतात. असे सद्गुरु कि जे आपले स्नेही, तत्त्वज्ञ व मार्गदर्शक आहेत. मिळणे खरोखरच दुर्मिळ होय.

श्रीसाईबाबांसारखे सदगुरु काही निश्चित ध्येय साध्य करण्यासाठी अवतार घेतात. व त्याद्वारे आपल्याला व जनता जनार्दनाला जागृत करतात. व अवतार कार्य पूर्ण झाल्यावर ब्रम्हलीन होतात. त्यांच्यासारख्या अवतारामुळे आपण जे कल्याणाच्या मार्गावर येतो ते जरी आज देहरूपाने वावरत नाहींत तरी त्यांचे अस्तित्व आपल्याला वाऱ्याप्रमाणे पदोपदी जाणवते. त्यांचे अस्तित्व आपल्या हृदयात सतत असून त्यामुळे ते आपल्याला सतत प्रगति, भक्ति व कल्याण या गोष्टींचा प्रसाद देत असतात. त्यामुळे आपल्याला वैयक्तिक दुःखे जाणवतच नाहीं. म्हणूनच त्यांच्याबाबत असे सार्थपणे म्हणता येईल कीं,

गंगा पापं शशी तापं दैन्यं कल्पतरूस्तथा ।
पापं तापंच दैन्यंच हरन्ति संतो महायशा: ।

गंगा स्नानाने पाप नष्ट होते. चंद्रकिरणानें प्रखरता कमी होते. आणि कल्पवृक्षामुळे दारिद्र्याचा नाश होतो. परंतु संतांच्या कृपेने या तिन्हींचा एकदम नाश होतो.

असे समर्थ कृपाळू, दुःखनिवारक आणि दया सागर संत श्री साईबाबांचे सान्निध्य व सतत सहवास आपल्या सर्वांचे भवितव्य उज्वल करो व त्यांची कृपादृष्टी आपल्याला सतत योग्य मार्गदर्शन करो हीच मनःपूर्वक प्रार्थना –

☆

## अ. भा. श्रीसाईभक्त लेखक–कवींचे नवापूर येथे मे मध्ये स्नेहसंमेलन

अखिल भारतीय श्रीसाईभक्त लेखक–कवींचे पहिले संमेलन नवापूर येथे मे महिन्यात भरविण्यात येत आहे. या संमेलनात महाराष्ट्रातूनच नव्हे तर भारताच्या कोना कोपऱ्यातून मान्यवर लेखक–कवी व्यक्ति उपस्थित रहाणार आहेत. या संमेलना निमित्याने साईगीत दरबार व कै. ताराई चेंदवणकर स्मृती काव्य स्पर्धेसाठी कविता मार्च ८४ अखेर पाठवाव्यात असे आवाहन श्री. रमेश चव्हाण, नवापूर यांनी केले आहे. साईगीत दरबार साठी ३ कविता पाठवाव्यात तर कै. ताराई काव्य स्पर्धेसाठी "साई माझा सखा नसे मज धोका" या ओळीवर कविता लिहून पाठवाव्यात. साहित्य पाठविण्याचा पत्ता श्री. रमेश चव्हाण, साईनिकेतन, गुजर लेन, नवापूर.

# साईबाबांच्या सानिध्यात आलेले काही प्राणी

(१) **वाघ** – दरवेशाच्या वाघाने बाबांच्या समोर द्वारकामाईत प्राण सोडला.

(२) **घोडा** – श्यामसुंदर घोडा बाबांच्या पालखीच्या पुढे नाचत असे

(३) **पाल** – औरंगाबादहून घोडेस्वाराबरोबर आलेली पाल द्वारकामाईतल्या पालीला भेटली.

(४) **शेळ्या** – एकदा एक शेळ्यांचा कळप शिर्डीच्या रस्त्यातून चालला असताना बाबांनी त्यातील २ शेळ्या निवडल्या व त्यांना शेरभर डाळ चारली व त्यांना परत कळपात सोडून दिल्या.

(५) **बोकड** – एका आसन्न मरण बोकडाला द्वारकामाईत बाबांच्या समोर मारण्याची पाळी काकासाहेब दिक्षीतांवर आली होती.

(६) **सर्प–बेडूक** – एका सर्पाने एका बेडकाला आपल्या तोंडात धरले होते ते पाहून बाबांनी पूर्व जन्माच्या वैराची आठवण करून दिली.

**–श्री. माधव गजानन गोरे**
विनायक बाग, बालाजी मंदीर मार्ग
कुर्ला (पश्चिम), मुंबई ४००.०७०.

---

**श्री माणिकप्रभु सांप्रदायिक मंडळ, मुंबई.**

चतुर्थ दत्तावतार सकलमताचार्य श्री. माणिक प्रभू महाराज यांचे पाचवे उत्तराधिकारी प. पू. श्री. सिद्धराज माणिक प्रभुमहाराज हे एप्रिलच्या तिसऱ्या आठवड्यात मुंबईस आगमन करीत आहेत. श्रीजींचा मुंबापुरीतील मुक्काम जूनच्या दुसऱ्या आठवड्यापर्यंत असून त्यांच्या निवासाचे ठिकाण मोरोबा मॅन्शन (पहिला मजला) विष्णूधाम हॉलजवळ, १४ वा रस्ता लिंकिंग रोड, खार हे आहे. श्रीजींच्या मुंबई भेटीच्या कालावधीत सांप्रदायिक भजने, पाद्यपूजा इ. कार्यक्रम आयोजित करण्यात येत आहेत. मुंबईतील सर्व भाविकजन श्रीजींच्या दर्शनाचा लाभ घेतील व त्यांच्या उपस्थितीत होणाऱ्या कार्यक्रमात बहुसंख्येने भाग घेतील अशी आशा आहे. या संबंधात विशेष माहिती कु. लीना मेरकर, बी–२२ सन एन सी अपार्टमेंटस् जुहू रोड, जुहू येथे करावी. दुरध्वनी ५४ ७० ७०.

# शिरडी–वृत्त माहे ऑक्टोबर ८३

या महिन्यात श्री साईबाबांचा पुण्यतिथी उत्सव आल्यामुळे बाहेरगावच्या साईभक्तांची गर्दी जास्त प्रमाणात होती.

**दसरा उत्सव १ ला दिवस :–** शनिवार दि. १५–१०–८३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरु झाली आरती संपल्या वर ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक समाधी मंदिरातून गुरु-स्थानमार्गे द्वारकामाईत गेली. त्या ठिकाणी साई सच्चरित अध्याय वाचनास सुरवात झाली. समाधी मंदिरात सकाळी ६–३० वा. श्रींचे स्नान झाल्यानंतर नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त दुपारी ४ ते ६ पर्यंत ह. भ. प. श्री. चिंतामणबुवा शिरवळकर, डोंबिवली यांचे कीर्तन झाले. सायंकाळी धूपारती झाल्या नंतर ७–३० ते ९–०० व ९–३० ते ११–१५ पर्यंत श्री. शरद जांभेकर मुंबई यांचे गायन झाले. रात्रौ ९–१५ ते ११–१५ पर्यंत श्रींच्या पालखीची मिरवणूक वाद्यांच्या गजरात गावात फिरून आल्यावर शेजारती झाली.

**उत्सवाचा मुख्य दिवस :–** रविवार दि. १६–१०–८३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींच्या फोटोची व पोथीची मिरवणूक द्वारकामाईतून निघून गुरुस्थानमार्गे समाधी मंदिरात आली. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त ९ वाजता भिक्षा झोळी कार्यक्रम झाला. मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरे साहेब यांनी स्वतः झोळी घेऊन उपस्थित साईभक्तांना झोळ्या दिल्या. शिर्डी गावात घरोघरी भिक्षेसाठी गेल्यावर सुवासिनींनी श्रींच्या निशाणाची पूजा आरती करून भिक्षा झोळीत गहू, ज्वारी, बाजरी, फळे, नारळ पैसे अशी भिक्षा यथाशक्ति अर्पण करून प्रसाद घेतला. सकाळी १० ते १२ पर्यंत ह. भ. प. चिंतामणबुवा शिरवळकर यांचे श्रीसाईबाबा पुण्यतिथी आख्यान कीर्तन झाले. त्यानंतर माध्यान्ह आरती झाली व तिर्थप्रसाद वाटण्यात आला.

दुपारी १ ते ३ वाजेपर्यंत श्रींचा आराधना विधी कार्यक्रम मा. रिसीव्हर श्री. काकरेसाहेब यांचे हस्ते झाला. यजमान म्हणून त्यांनी ब्राम्हणांना धोतर, उपरणे, व सुवासीनींना खण दिले, तसेच सेवेकऱ्यांना धोतर जोड व कपडा दिला. सायंकाळी मिरवणूक वाजत गाजत खंडोबाचे देवळाजवळ गेली. त्या

ठिकाणी श्रींच्या निशाणाचे व शनीचे पूजन झाल्यावर सोन लुटण्याचा कार्यक्रम झाला. त्यानंतर मा. रिसीव्हर साहेब व उपस्थित भक्त मंडळीने खंडोबा देवाचे दर्शन घेतले. व मिरवणूक परत येतेवेळी गावातील सर्व मंदिरात जाऊन देवतांचे दर्शन घेतले.

रात्री ९–१५ ते १२ पर्यंत श्रींच्या रथाची मिरवणूक गावातून निघाली होती. मिरवणूकीला श्रीकृष्ण बॅंडपथक अग्रभागी होते. सनई, चौघडा, डफ व राहता येथील बॅंडपथक बरोबर होते. साईभक्तांचे भजन, गायन, नृत्य कार्यक्रम झाले. श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे यांचे गारुड–भारूडाचा कार्यक्रम झाला. तसेच लोकल ग्रामस्थानी भारूड गारूडाचे कार्यक्रम केले. रथाची मिरवणूक रात्री १२–०० वा. समाधी मंदिरात आली व भक्तांनी कलाकारांचे गायनाचे कार्यक्रमात भाग घेतला. रात्रभर कलाकारांच्या हजेऱ्या झाल्या. श्रींच्या दर्शनासाठी मंदिर रात्रभर खुले होते.

**दसरा उत्सव ३ रा दिवस** :– सोमवार दि. १७–१०–८३ रोजी पहाटे ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. गुरुस्थान ठिकाणी सकाळी ७–३० ते ८–३० रुद्राभिषेक झाला. नित्य कार्यक्रमा व्यतिरिक्त रात्रौ ८–०० ते १० वाजेपर्यंत ह. भ. प. श्री. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिर्डी, यांचे एकादशी निमित्त प्रवचन झाले व त्यानंतर शेजारती झाली.

**दसरा उत्सव ४ था शेवटचा दिवस** :– मंगळवार दि. १८–१०–८३ रोजी पहाटे ५ वा. मंदिर उघडल्यावर ५–१५ वा. काकड आरती सुरू झाली. ६ वा. श्रींचे मंगलस्नान झाले. सकाळी १०–३० ते १२–०० पर्यंत ह. भ. प. चिंतामणबुवा शिरवळकर, डोंबिवली यांचे कालाकीर्तन झाले. दहीहंडी कार्यक्रम झाल्यावर माध्यान्ह आरती झाली व तीर्थ प्रसाद वाटण्यात आला. धूपारती नंतर रात्री ७–३० ते १०–०० पर्यंत आनंद संगीत विद्यालय कोपरगाव यांचे संगीत गायनाचा कार्यक्रम झाला. १० वा. शेजारती झाली व उत्सव समाप्त झाला.

**कोजागिरी पौर्णिमा** :– शुक्रवार दि. २१–१०–८३ डॉ. के. बी. गव्हाणकर आणि पार्टी, कुर्ला, मुंबई यांनी रात्रौ ८ ते १० कलाकारांची हजेरी व १० ते १२ वाजेपर्यंत कीर्तन कार्यक्रम केला. रात्रौ १२ वा. श्रीसाईबाबांची पूजा

व चंद्रपूजा कार्यक्रम मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे हस्ते झाला. उपस्थित भक्तमंडळींना दूध पोहे वगैरे प्रसाद वाटण्यात आला. रात्रौ १२–३० ते सकाळी ६ वाजेपर्यंत डॉ. के. बी. गव्हाणकर आणि पार्टीतील सहकाऱ्यांनी गायक श्री. प्रकाश प्र. दिघे, डोंबिवली यांनी गीत रामायणचा कार्यक्रम सादर केला व जागर केला. काही कलाकारांनी श्रींच्या पुढे हजेरी दिली ती खालील-प्रमाणे :–

**कीर्तन :–** १) ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, जि. सांगली.
२) ह. भ. प. चिंतामणबुवा शिरवळकर, डोंबिवली.
३) ह. भ. प. सौ. सहस्त्रबुद्धे.
४) ह. भ. प. सौ. प्रमिला द. पैठणकर.
५) ह. भ. प. सौ. पद्मजा देशपांडे

**प्रवचन :– १**) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे शिर्डी.

**भजन, गायन, वादन वगैरे :–** १) श्री. साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. २) श्री सत्यसाई समिती, उल्हासनगर, ३) श्री. मुकुंद लक्ष्मण मयूर, राहुरी, ४) श्री. ओमप्रकाश रामकिसन वर्मा, संगमनेर, ५) श्री. सुनील मारुती कुलये, संगमनेर, ६) श्री. सुरेश अंबादास मयूर, संगमनेर, ७) श्री. राकेश मधुर, मेनपूरी बेट (उ. प्र.) ८) श्री. गुलाब बनारसी कव्वाल, कलकत्ता, ९) श्री. गोपाळ चौरसीया, कलकत्ता, १०) श्री. श्रीराम सातर्डेकर, मुंबई. ११) डॉ. एम. के. कीर्तीकर, मुंबई. १२) श्री. शरद जांभेकर, मुंबई. १३) श्री. शेखर खांबेटे. १४) श्री. मकरंद कुंडले, १५) श्री. कृष्णाचारी, १६) श्री. भोलानाथ समेळ, मुंबई. १७) श्री. राकेश सक्सेना, मैनपूरी. यु. पी. १८) श्री. गुलाब बनारसी कवाल, कलकत्ता. १९) कुमार चंद्रदीप, कलकत्ता. २०) श्री. सी. व्ही. प्रसाद, हैद्राबाद. २१) सौ. गिरजेबाई, शिर्डी. २२) सौ. शरयू मराठे, शिर्डी. २३) श्री. नारायण क्षीरसागर, चिकलठाणा. २४) श्री. दौलतभाई शर्मा, मुंबई. २५) श्री. आर. पी. जैस्वाल, कलकत्ता. २६) श्री. गोपालभाई चौरसीया, कलकत्ता. २७) श्री. रघुनाथ बाबूराव सांडभोर, पुणे. २८) सौ. विमलबाई बाबूराव पुरोहित, शिर्डी. २९) कुमार शेखर नटवर, विसपुते, शिर्डी. ३०) श्री. वसंत घुमकर (स्काऊट) मुंबई. ३१) श्री. नामदेव नागू भोईर, नवघर. ३२) श्री. श्रीराम व्ही. सातर्डेकर, मुंबई. ३३)

श्री: कीर्तीकर, मुंबई. ३४) श्रीमती मनीबेन हैद्राबाद. ३५) श्री. नवशेर इराणी मुंबई. ३६) सौ. नारेश्वरी गुप्ता, हैद्राबाद, ३७) श्री. ज्ञानेश्वर वैद्य, शिर्डी. ३८) श्री. नागेश चुरीया. ३९) श्री. हरिश्चन्द्र चंद्रभान हंगवाल, आलेगांव. ४०) श्री. ज्ञानबा वाडकर, शिर्डी. ४१) श्री. शेख नबाब उमर पटेल, अस्त-गाव ४२) श्रीमती कौसल्याबाई चोप्रा, शिर्डी. ४३) श्रीमती हीराबाई सोलव नागपूर. ४४) श्री. गोविंद संभाजी खांडरे, शिर्डी. ४५) श्री. प्रियो गुप्ता, कल्लूर. ४६) श्री. सखाराम राघुजी गुरव, कोपरगांव. ४७) श्री. अरुण खांडलेलकर, इंदोर. ४८) श्री. बिंदू प्रसाद गुप्ता, कलकत्ता. ४९) श्री. पुंजाबा भावराव दवंग, शिर्डी. ५०) श्रीमती लीलाबाई गुजराथी, शिर्डी. ५१) अनु-पमा महाजन, मुंबई. ५२) श्री. शशीकांत ए. दळवी, मुंबई. ५३) श्री बारकूशेठ मांडवकर. ५४) श्री. विलास रा. महाडीक. ५५) श्री. अभय ज. मोरे. ५६) सुरेश आंजर्लेकर. ५७) श्री. राजन सातवरे. ५८) श्री. सतीश राव. ५९) श्री. शिवदास शिरोडकर. ६०) श्री. सुभाष ज. कांबळी. ६१) श्री. वसंत जोशी. ६२) श्री. विलास परळकर. व श्री. विवेक मुळे ६३) श्री. रघुनाथ नागरे, शिर्डी. ६४) श्री. चतुर्भुज नागरे, शिर्डी. ६५) श्री. मधुकर निवृत्ती भालेराव, शिर्डी. ६६) श्री माणिकसाळी शिर्डी. ६७) श्री. शांताराम मिराणे. ६८) श्री. आनंद दत्तात्रय करंबेळकर. शिर्डी. ६९) श्री. प्रदीप रासन्, अहमदनगर. ७०) श्री. महेश सावर्डेकर. ७१) श्रीकृष्ण बॅंडपथक, श्री. सदानंद य. दळवी व गोपाळ नाफडे, मुंबई. व इतर ३३ कलाकार. ७२) श्री. वसंतकुमार घुमकर, रोवर्स रेंजर्स सेंट्रल रेल्वे मुंबई ७३) श्री. आनंद डी. पाटील. ७४) श्री. विश्वास डी. गायकवाड. ७४) श्री. व्ही. एम. पाटील. ७५) श्री. के. बी. ठाकूर. ७६) श्री. जे. ए. राणे. ७७) श्री. आर. एस. भिंद्रा. ७८) श्री. आर. पी. गरुड. ७९) श्री. आर. पी. काशवाटे. ८०) श्री. जी. आर. वरळीकर. ८१) श्री. वाय. ए. पाटील. ८२) श्री. जी. के. शेटी. ८३) श्री. व्ही. व्ही. ठाकूर. ८४) श्री. ए. जी. कारखानीस. ८५) श्री. डी. बी. पोतदार. ८६) श्री. ए. जी. माखीया ८७) श्री. बाबूराव घार्वे, मुंबई. ८८) श्री. एम. ए. जोशी. ८९) श्री अनिलकुमार सोनवणे. ९०) श्री. एस. के. वाघवान. ९१) श्री. जे. डी. शेषकर. ९२) श्री. एस. ए. जगताप ९३) श्री. आर. आर. माळी. ९४) श्री. अनिल आहेर. ९५) सौ. शशीकला आर. शिवनेरकर. ९६) सौ. राधा बी. नागपाल. ९७) सौ. बालू बी. नागपाल. ९८) श्री. प्रमोद जाधव. ९९) श्री. बारावकर काका, शिर्डी. १००) आनंद संगीत विद्यालय, कोपरगाव.

श्री. आनंद के. आढाव. १०१) ह. भ. प. बाबा नरोडे. १०२) श्री. प्रा. अ. वि. घसास. १०३) श्री. काळवाघे ॲडव्होकेट. १०४) श्री. वाबळे ॲड-व्होकेट. १०५) श्री. रामभाऊ कीरे. १०६) कु. रोहिणी बेलसरे. १०७) कु. मोहिनी वैद्य. १०८) श्री. अनंत जोशी. १०९) श्री. द्वारकानाथ लोंगाणी. ११०) श्री. एस. आर. गुरव. १११) श्री. बी. सी. सातव. ११२) डॉ. एन. आर. झवेरी. ११३) श्री. साईबाबा भक्त मंडळ महिला गुंटूर. ११४) श्री. साईनाथ भजनी मंडळ, शिर्डी. ११५) श्री. तुकाराम नारायणराव भूमकर, पुणे. ११६) स्वाती मोघे, रायपूर. ११७) श्री. प्रकाश प्र. दिघे, डोंबिवली. ११८) श्री. अरुण पां. शहाणे, डोंबिवली. ११९) डॉ. गव्हाणकर कोजागिरी उत्सव मंडळ, कुर्ला, मुंबई. १२०) श्री. उमेश धनवटे. १२१) श्री. राम पाटील. १२२) श्री. श्रीधर राणे. १२३) श्री. दिलीप राणे. १२४) श्री. प्रशांत राणे. १२५) किर्ती राणे. १२६) श्री. दिलीप मयेकर. १२७) शाहीर सुखदेव कांबळे. १२८) श्री. विनायक लाड. १२९) श्री. दत्ता मोरे. १३०) श्री. नामदेव केणी. १३१) श्री. अनंत पांचाळ, १३२) श्री. शशीकांत पुसाळकर. १३३) शाहीर मधुकर खामकर. १३४) श्री. सुधाकर पाटील. १३५) श्री. प्रकाश शिंदे. १३६) श्री. प्रफुल्ल राजापूरकर. १३७) श्री. जगदीश शिंदे. १३८) श्री. शांताराम पाटील. १३९) श्री. आप्पा सामंत. १४०) सौ. रिसवडकर. १४१) सौ. लता देवरूखकर. १४२) कु. सुरेखा निकम. १४३) श्री. दिपक शिंदे. १४४) श्री. रामचंद्र बारी. १४५) श्री. श्री. नामदेव दळवी. १४६) श्री. अशोक वागजे. १४७) श्री. रमेश साळवी. १४८) श्री. ज्ञानेश्वर देवकर. १४९) श्री. सुदाम हुलावके. १५०) सौ. मयेकर. १५१) सौ. सुधा राणे. १५२) कु. अरुणा मयेकर. १५३) श्री. विश्वास नार्वेकर. १५४) श्री. महेंद्र आंबेडकर. १५५) श्री. जे. के. सावंत. १५६) सौ. सावंत. १५७) सौ. इंदूमती तावडे. १५८) सौ. शर्मा. १५९) कुसूम गोलाटी. १६०) श्री. जे. एन. मोगरालीया. १६१) नरगिस मोगरालीया १६२) श्री. प्लंबर. १६३) श्री. चंद्रकांत तांबोळी. १६४) श्री. सूर्यकांत लांडे. १६५) श्री. राम शेट्टे. १६६) श्री. शांताराम नाईक. १६७) श्री. मनोहर गोलांबरे. १६८) श्री. वसंतराव गव्हाणकर. १६९) श्री. कृष्णा निमणकर. १७०) श्री. चंद्रकांत शिवगण. १७१) श्री. विजय धुरी. १७२) श्री. तुकाराम तीर्लोटकर. १७३) श्री. भालचंद्र पाटील. १७४) श्री. श्रीरामचंद्र बोबाटे. १७५) श्री. एकनाथ बोबाटे. १७६) श्री. रविंद्र पांचाळ. १७६) श्री. दिपक तुळसकर. १७७) श्री. प्रभाकर कुलकर्णी. १७७) श्री. सुरेश ढकाळे.

१७८) श्री. अविनाश माडगांवकर. १७९) श्री. दिलीप माणगांवकर. १८०) श्री. सुरेश मयेकर १८१) व्ही पिच्चूमणी १८२) सौ उषा बापट, ठाणे १८३) सौ आंग्रे १८४) श्री. के. टी. टिकू १८५) जे पी टिकू १८६) वीना टिकू १८७) सौ. प्रमिला द. पैठणकर. १८८) सौ. पद्मजा देशपांडे. १८९) श्री. एकनाथ गणेश माटेकर, ग्वालीयर. १९०) श्री. मोरेश्वर उर्फ बंडोपंत वासुदेव सोलापूरकर. १९१) श्री. राजेंद्र हरीभाऊ देशमुख. बाजोरीया नगर. १९२) मीरा सदाशिव इनामदार. कोल्हापूर. १९३) श्री साईदास हैद्राबाद. १९४) करसनलाल त्र्यंबक भावसार. मालेगाव. १९५) सौ. आसावरी स. देव ठाणे. १९६) श्री. जयवंतराव कुलकर्णी, मुंबई. १९७) श्री. अशोक बाळकृष्ण कदम, शहापूर. १९८) श्री. शशीकांत अनंत लेले, विलेपार्ले. १९९) दयानंद शांताराम पिळणकर. दिघी. २००) श्री. प्रल्हादराव नेरलेकर, अकोला.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

# शिरडीवृत्त माहे नोव्हेंबर ८३

या महिन्यात श्रीसाईबाबांचे दर्शनासाठी बाहेरगावची भक्तमंडळी बरीच आली होती काही कलाकारांनी श्रीं पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे –

**कीर्तन –** १) ह. भ. प. किसन महाराज हरदे, संगमनेर.
२) ह. भ. प. कृष्णाबाई येवलेकर
३) श्रीमती जानकीबाई इंगळे, गोरेगाव, मुंबई.

**प्रवचन –** १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाकचौरे, शिर्डी.
२) ह. भ. प. बाप्पाजीकाका रत्नपारखी, शिर्डी.
३) ह. भ. प. विश्वनाथ बंडू सहान.
४) ह. भ. प. मुरलीधरबुवा देशमुख, शिर्डी.

**भजन, गायन, वादन, नृत्य वगैरे –** १) श्री. प्रल्हादराव नेरोलकर, अकोला. २) श्रीमती चंद्राबेन विठ्ठलदास भाटे, वडाळा. ३) श्रीमती नलिनी कपीलभाई दवे, भावनगर. ४) कु. वंदना शिरोडकर, मुंबई. ५) श्री. विश्वनाथ शिरोडकर, मुंबई. ६) श्री. वसंत काशिनाथ काडणेकर, मुंबई. ७) श्री. पारक चंपालाल गोरवाल, शिर्डी. ८) सौ. प्रमितीभावना दामोदर जेबूरकर, डोंबिवली, ९) श्री. यशवंत पितळे, मुंबई. १०) श्री. मनोहर पारकर. ११) श्रीमती शरद आचार्य, बांद्रा. १२) श्री. मदन खारपट आणि मंडळी, विलासपूर. १३) श्री. साईनाथ भजन मंडळी, शिर्डी. १४) श्री. दत्तात्रय तुकाराम दयाळ, सातारा. १५) श्रीमती संगीता अरुण जोशी, अहमदाबाद. १६) श्री. पायगोडे, भोर. १७) कु. वर्षा गजानन घाणेकर, मुंबई. १८) श्री. एस. एन. संतोषकुमार, सिकंदराबाद. १९) श्री. विठ्ठल मांजरेकर, शिरडी. २०) श्री. जयवंत कुळकर्णी, मुंबई. २१) श्री. अनंत एस. पांचाळ, २२) श्री. अरविंद म्हात्रे, २३) श्री. दिलिप शंकर सावंत. २४) श्री नारायणमहाराज भजनी मंडळ, कुर्ला. २५) श्री. गोपाल चौरसिया, कलकत्ता. २६) श्री. तानाजी लक्ष्मण आचचर. शिर्डी. २७) श्री. पुरुषोत्तम जनार्दन गोसावी, बबली. २८) श्री. पिसे व नवनाथ भजनी मंडळ, डोऱ्हाळा. २९) श्री. किसन श्रीपती पायगुडे, भोर.

**कार्तिकी एकादशी :–** बुधवार १६–११–८३ सालाबादप्रमाणे कार्तिकी

एकादशी निमित्त रात्री कीर्तन–प्रवचन झाल्यावर श्रींच्या पालखीची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**तुळशी विवाह** – गुरुवार दि. १७–११–८३ सालाबाद प्रमाणे श्रींचे द्वारकामाईत तुळशी विवाह कार्यक्रम संपन्न झाला. संस्थान कर्मचारी व साईभक्त मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्वांना प्रसाद वाटणेत आला. मुलांनी फटाके, भुईनळे, वाजवून आनंद व्यक्त केला.

**हवापाणी** – शिर्डी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं. थंडीचे प्रमाण वाढले आहे.

**लक्ष्मीपूजन** – शुक्रवार दि. ४–११–८३ दिवाळीला लक्ष्मीपूजनाचा कार्यक्रम मा. रिसीव्हर श्री. क. हि. काकरेसाहेब यांचे हस्ते झाला. धुपारती झाल्यावर साईभक्तांना तीर्थप्रसाद वाटण्यात आला.

दि. २७–११–८३ पासून येथे ६ वे नेत्रशिबिर सुरू झाले आहे.

☆

## शिरडीवृत्त माहे डिसेंबर १९८३

या महिन्यात नाताळाचे सुट्टीमुळे श्री साईनाथांचे दर्शनासाठी साईभक्तांची गर्दी फार होती. शाळांच्या, कॉलेजच्या, कारखान्यांच्या सहली बऱ्याच मोठ्या प्रमाणात होत्या.

काही कलाकारांनी श्रींचे पुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :–

**कीर्तन** – १) एकादशी व महत्त्वाचे दिवशी संस्थानतर्फे कीर्तने झाली.
२) ह. भ. प. जगन्नाथबुवा वाकचौरे, शिर्डी.

**प्रवचन** – १) ह. भ. प. मुरलीधर महाराज देशमुख, शिरडी.
२) ह. भ. प. लक्ष्मण आनंदा मिरजकर, इस्लामपूर.

**भजन, गायन, वादन वगैरे** – १) श्री. किशन श्रीपती पायगुडे, भोर. २) श्री वसंतराव केशवराव गायकवाड, पुणे. ३) ह. भ. प. येवतकर भजनी मंडळ. ४) डॉ. एम. के. किर्तीकर. ५) श्री. वसंतराव फुलंब्रीकर. ६) श्री. राम दिक्षित, डोंबिवली. ७) श्री. दत्तारम विठ्ठल बाग, मुंबई. ८) श्री. पन्नालाल जैन, झांशी. ९) श्री. गोपाळ सत्संग मंडळ, बांद्रा. १०) श्री. अरुण सोमानी, संगमनेर. ११) श्री. शिवराम बिडवे, संगमनेर. १२) श्री. रामचंद्र गजानन देशपांडे, अंबरनाथ. १३) श्री. आबाजी पंढरीनाथ डांगे, कनकुरी. १४) श्री. जयराम वामन चौधरी. नांदुर्खी. १५) श्री. शांतीलाल मेहरा, शंकर, मुंबई. १६) श्री. सुरेश मावीनकुर्वे, मुंबई. १७) श्री. स्वामी कृष्णदास, वृंदावन. १८) श्री. अरविंद नारायणस्वामी कोपरे, औंढा नागनाथ, १९) श्री. विनायक महादेव वेवेकर, मुंबई. २०) श्री. विकास कशाळकर, मुंबई. २१) श्री. पुरुषोत्तम गांगुर्डे, मुंबई. २२) सौ पदमावती श्रीपाद ओत्री, मुंबई. २३) श्री. चंद्रशेखर मनोहर देशपांडे, हडपसर. २४) श्री. अशोक होळकर, हडपसर. २५) श्री. मनोहर देशपांडे, हडपसर. २६) श्री. बाळासाहेब सावंत, हडपसर. २७) श्री. कमल मुजुमदार, जमशेदपूर. २८) श्री. साईधाम देवालय भजनी मंडळ, मुंबई २९) श्री. बापू जोशी. पूरापूरकर. ३०) श्रीमती वेदावती चैतन्यपुरी हैद्राबाद.

**श्री दत्तजयंती** – सोमवार दि. १९–१२–८३ रोजी सालाबाद प्रमाणे समाधी मंदिरात श्री दत्त जयंतीचा कार्यक्रम झाला. दत्त जयंतीला भक्तांची दर्शनासाठी खूपच गर्दी होती. दत्तजन्म कीर्तन ह. भ. प. जगन्नाथबुवा वाकचौरे शिर्डी यांनी केले. रात्री विद्युतरोषणाई, सुशोभित रथाची मिरवणूक गावातून फिरून आल्यावर शेजारती झाली.

**हवापाणी** – शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काहीं नाहीं. पहाटे हवेत थोडा गारवा असतो.

# घोषणा

श्री साईलीला मासिकाच्या मालकीबद्दल व अन्य तपशीलाबद्दल दर वर्षी फेब्रुवारी नंतरच्या पहिल्या अंकात प्रसिद्ध करावयाची घोषणा.

| | | |
|---|---|---|
| १. | प्रकाशनाचे स्थळ – | साई निकेतन,<br>८०४–बी डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई – ४०० ०१४. |
| २. | प्रकाशनाचा कालावधी – | मासिक. |
| ३. | मुद्रकाचे नाव | श्री. पांडुरंग दाजिबा मोरे |
| | राष्ट्रीयत्व | भारतीय. |
| | पत्ता – | बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स, वडाळा,<br>मुंबई – ४०० ०३१. |
| ४. | प्रकाशकाचे नाव – | श्री. क. हि. काकरे |
| | राष्ट्रीयत्व – | भारतीय |
| | पत्ता – | साई निकेतन,<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई – ४०० ०१४. |
| ५. | संपादकाचे नाव – | श्री. क. हि. काकरे |
| | राष्ट्रीयत्व – | भारतीय, |
| | पत्ता – | साई निकेतन,<br>८०४–बी, डॉ. आंबेडकर रोड, दादर,<br>मुंबई – ४०० ०१४. |
| ६. | हे पत्र ज्यांच्या मालकीचे आहे त्यांचे व १ टक्क्याहून अधिक भांडवल धारण करणारे भागधारक किंवा भागीदार यांची नावे व पत्ते. | श्री साईबाबा संस्थान, शिरडी<br>(धार्मिक व चॅरिटेबल संस्था) |

मी, श्री. क. हि. काकरे यानुसार असे घोषित करतो की वरील तपशील माझ्या माहितीप्रमाणे व समजुतीप्रमाणे सत्य आहे.

क. हि. काकरे
(प्रकाशकाची सही)
रिसिव्हर

# साईंबाबा संस्थान शिरडीची प्रकाशने

| अ. क्र. | पुस्तकाचे नाव | भाषा | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | श्री साईचरित्र | मराठी | २२–०० | ६–०० |
| २) | ,, | इंग्रजी | १३–५० | ४–०० |
| ३) | ,, | हिंदी | १२–०० | ४–०० |
| ४) | ,, | गुजराथी | १२–०० | ४–०० |
| ५) | ,, | कन्नड | १०–०० | ४–०० |
| ६) | ,, | तेलगू | १३–०० | ४–०० |
| ७) | ,, | तामीळ | १२–०० | ४–६० |
| ८) | श्री साईलीलामृत | मराठी | ७–५० | ३–०० |
| ९) | ,, | हिंदी | ७–०० | ३–५० |
| १०) | ,, | गुजराथी | ४–२५ | ३–०० |
| ११) | अवतार व कार्य | मराठी | ४–०० | ३–०० |
| १२) | स्तवन मंजरी | मराठी | ०–३५ | ३–०० |
| १३) | ,, | गुजराथी | ०–३० | ३–०० |
| १४) | सगुणोपासना | मराठी | ०–५० | ३–०० |
| १५) | ,, | गुजराथी | ०–५० | ३–०० |
| १६) | तेलगू पुजाविधी | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| १७) | चार अध्याय | मराठी | १–२५ | ३–०० |
| १८) | श्रीसाईबाबा ऑफ शिरडी (भरुचा) | इंग्रजी | ५–०० | ३–०० |
| १९) | किर्तनमाला | मराठी | ०–७५ | ३–०० |
| २०) | सचित्र साईबाबा | मराठी | ४–०० | ३–०० |
| २१) | शिरडी दर्शन | इंग्रजी | ४–५० | ३–०० |
| २२) | मुलांचे साईबाबा | मराठी | १–७५ | ३–०० |
| २३) | ,, | इंग्रजी | १–७५ | ३–०० |
| २४) | ,, | तेलगू | छपाई चालू | आहे. |
| २५) | ,, | गुजराथी | १–५० | ३–०० |
| २६) | ,, | हिंदी | १–७५ | ३–०० |

Regd. No. MH/BYE/26
LICENCE No. 19
Licence To Post Without Prepayment
At Dadar Head Office, Bombay-14

(कव्हर पृष्ठ ३ वरून)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| २७) | ग्रेट सेंट श्री साईबाबा | मराठी | ०–५० | ३–०० |
| २८) | श्री साईबाबा दि सुपरमॅन | इंग्रजी | ५–२५ | ३–०० |
| २९) | शिरडी गाईड | इंग्रजी | १–५० | ३–०० |
| ३०) | ,, | मराठी | १–५० | ३–०० |
| ३१) | शिरडी गाईड | गुजराथी | १–५० | ३–०० |
| ३२) | ,, | हिंदी | छपाई चालु | आहे. |
| ३३) | रुद्राध्याय | मराठी | ०–९० | ३–०० |

३४) श्रीसाईलीला, अधिकृत मासिक मुखपत्र मराठि व इंग्रजी वार्षिक वर्गणी १०–०० प्रत्येकी प्रत १–००
(व्ही. पी. ची पद्धत नाही)

| अ क्र. | फोटोचे नाव | फोटो साईज | किंमत रु. पैसे | पो. व पॅकिंग रु. पैसे |
|---|---|---|---|---|
| १) | आशिर्वाद फोटो | १४"×२०' | १–६५ | ३–०० |
| २) | ,, | १०"×१४' | १–१० | ३–०० |
| ३) | ,, | ७"×१०' | ०–५५ | ३–०० |
| ४) | ,, | ४"×५" | ०–२० | ३–०० |
| ५) | ,, | २"×३" | ०–१५ | ३–०० |
| ६) | दगडावर बसलेले बाबा (रंगीत) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ७) | ,, (काळा पांढरा) | १४"×२०" | १–६५ | ३–०० |
| ८) | मूर्ती फोटो | १३"×१८" | २–७५ | ३–०० |
| ९) | ,, | १३"×१८" | १–०० | ३–०० |
| १०) | द्वारकामाई कॅमेरा (रंगीत फोटो) | १०"×२०" | १–१० | ३–०० |
| ११) | ,, (काळा पांढरा) | १०'×१४" | ०–८५ | ३–०० |
| १२) | कॅमेरा द्वारकामाई फोटो , | ९'×१२' | १–१० | ३–०० |
| १३) | ,, (रंगीत) | ९"×१२' | १–६५ | ३–०० |
| १४) | निळा | ९×१३ | ०–७५ | ३–०० |
| १५) | श्रीसाईबाबांचे पत्र्याचे कॅलेंडर | — — — | १६–०० | ८–०० |

मुद्रक : **पांडुरंग मोरे**, बॉम्बे नॅशनल प्रिन्टर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर मार्ग, वडाळा, मुंबई ३१, संपादक व प्रकाशक : श्री. क. हि. काकरे, साई निकेतन, डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४, बी. दादर मुंबई१४.